पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक


# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ●वर्ष १६ ●अंक ३२ ●शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 | Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 | Web. https://epaper.citynewssuperfast.com

**सुविचार**

"प्रयत्न करणे कधीही सोडू नका, अपयश हा यशाच्या मार्गातील फक्त एक टप्पा आहे."




## »थोडक्यात

### ... तर प्रदेशाध्यक्ष पदाबाबत निर्णय घ्या : प्रशांत किशोर

पुणे : भविष्यात मी निवडणूक रणनीतीकार म्हणून राष्ट्रवादी काँग्रेससोबत काम करावे, असे तुम्हाला वाटत असेल तर प्रदेशाध्यक्ष पदाबाबत निर्णय घ्या, अशा शब्दांत प्रशांत किशोर यांनी सुनील तटकरे यांच्या कार्यपद्धतीबाबत थेटपणे नाराजी व्यक्त केल्याची माहिती समोर येत आहे. गुरुवारी मुंबईत सुनेत्रा पवार, पार्थ पवार आणि जय पवार यांच्यासोबत प्रशांत किशोर यांची बैठक झाली. तब्बल सहा तास ही बैठक सुरु होती. पार्थ पवार हे स्वत: चार्टड विमानाने प्रशांत किशोर यांना मुंबईला घेऊन आल्याचे सांगितले जाते.

---

### चिमुकलीवर अत्याचार प्रकरणी आज भंडारा बंद!

भंडारा : शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्डात गुरुवारी सकाळी ११ वाजेच्या सुमारास माणुसकीला काळीमा फासणारी अत्यंत संतापजनक घटना समोर आली आहे. एका अवघ्या ३ वर्षांच्या चिमुकल्या बालिकेला आमिष दाखवून एका ३० वर्षीय नराधमाने सार्वजनिक शौचालयात नेऊन तिच्यावर अत्याचार केला. या घटनेची माहिती मिळताच संपूर्ण भंडारा शहरात तीव्र संतापाची लाट पसरली असून, घटनेच्या निषेधार्थ आज 'भंडारा बंद'ची हाक देण्यात आली आहे.

---

### तब्बल ३० हजार २०९ शिक्षकांची भरती!


मुंबई : शिक्षक भरतीची प्रतीक्षा करणाऱ्या उमेदवारांसाठी एक मोठी बातमी समोर आली आहे. राज्यात ३० हजार शिक्षकांची पवित्र पोर्टलद्वारे भरती प्रक्रिया राबवली जाणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळा, खासगी अनुदानित शाळा, शासकीय शाळांतील शिक्षकांच्या ३० हजार २०९ पदांसाठी पवित्र संकेतस्थळामार्फत ही भरती प्रक्रिया राबवली जाणार. दरम्यान, प्रक्रियेअंतर्गत शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी उत्तीर्ण उमेदवारांना ११ ऑगस्टपर्यंत रिक्त पदांसाठी प्राधान्यक्रम नोंदवता येणार आहे. परिणामी आता भरती प्रक्रियेच्या प्रतीक्षेत असलेल्या पात्रताधारक उमेदवारांना दिलासा मिळाला आहे.

# राज ठाकरेंनी शिकवणी वर्गाचा घेतला 'क्लास'!

## शिक्षण पद्धतीवर टीका; क्लासेस ठरवणार विद्यार्थ्यांनी कुठे जायचे!

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**मुंबई :** आता नीटचा पेपर याच कोचिंग क्लासवाल्यांकडूनच फुटला ना? आत्तापर्यंत जेवढे पेपर फुटले, ते सर्व या कोचिंग क्लासवाल्यांकडूनच फुटले ना? नंदन नीलेकणी यांनी या क्लासेसवर पहिल्यांदा लक्ष दिलं पाहिजे. क्लासेस ठरवणार की विद्यार्थ्यांनी कोणत्या कॉलेजमध्ये जायचं? ही कुठची शिक्षण पद्धत?' असा थेट सवाल करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी राज्यातील शिक्षण व्यवस्था आणि कोचिंग क्लासेसच्या मनमानी कारभारावर जोरदार हल्लाबोल केला.पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीनंतर आयोजित पत्रकार परिषदेत बोलताना राज ठाकरे यांनी नीट पेपरफुटी प्रकरण, शिक्षण क्षेत्रातील बाजारीकरण, विद्यार्थ्यांचे होणारे हाल आणि सरकारच्या उदासीनतेवर अत्यंत आक्रमक शब्दांत भाष्य केले. शिक्षण पद्धतीत झालेल्या भीषण बदलांवर बोट ठेवताना राज ठाकरे म्हणाले, 'आज राज्यातील शिक्षण परिस्थिती अत्यंत बिकट आणि बिकार झाली आहे. दहावी पास झाल्यावर विद्यार्थ्यांनी पहिल्यांदा कोचिंग क्लासमध्ये ॲडमिशन घ्यायची आणि मग तो क्लास ठरवणार की विद्यार्थ्यांनी कोणत्या कॉलेजमध्ये प्रवेश घ्यायचा! आज विद्यार्थी कॉलेजला न जाता आठ-आठ तास कोचिंग क्लासेसमध्ये जाऊन बसत आहेत. मग महाविद्यालये काय करत आहेत? कॉलेजची फी २० हजार आणि क्लासची फी १ लाख ४० हजार रुपये! हे क्लासेस आणि कॉलेजच्या संगनमतानेच चालले आहे,' असा थेट आरोप त्यांनी केला. आठ-आठ तास क्लासमध्ये असणाऱ्या विद्यार्थ्यांची कॉलेजमधील उपस्थिती (अटेंडन्स) कशी लागते, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. नीट पेपरफुटीमुळे आत्महत्या केलेल्या २१ विद्यार्थ्यांची यादी प्रशासनाकडून येते, पण त्या यादीत नाशिकच्या यश गोसावीचे २२ वे नाव जोडायला या सरकारला आणि प्रशासनाला वेळ नाही,' अशा शब्दांत त्यांनी सरकारची कानउघाडणी केली.



### जंतर-मंतरवरील आंदोलन ही केवळ सुरुवात

तरुणांच्या आणि विद्यार्थ्यांच्या वाढत्या असंतोषाचा इशारा देताना राज ठाकरे म्हणाले, जंतर-मंतरवर झालेले आंदोलन ही केवळ सुरुवात आहे. आंदोलनात आलेले सगळेच काही नीटचे विद्यार्थी नव्हते, पण जो तरुण तिथे आला होता, त्याच्या मनात सरकार आणि या कुजलेल्या व्यवस्थेविरुद्ध प्रचंड राग आहे. सरकारने या असंतोषाची वेळीच दखल घेतली नाही आणि या बेकायदेशीर कोचिंग क्लासेसवर लगाम घातला नाही, तर हा राग अधिक मोठ्या प्रमाणावर बाहेर पडेल.




## चौकशी समितीच्या अहवालात गंभीर अनियमितता उघड

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अकोला:** जिल्हा परिषद अकोला येथील प्राथमिक शिक्षक संवर्ग १ आणि संवर्ग २ च्या २०२५ मधील ऑनलाईन बदल्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि गैरप्रकार झाल्याचे त्रिस्तरीय चौकशी समितीच्या अहवालातून उघडकीस आले आहे. अकोला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या आदेशानुसार स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीने आपला अहवाल सादर केला असून, यामध्ये अनेक धक्कादायक बाबी समोर आल्या आहेत. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) अरविंद मोहिरे यांच्या अध्यक्षतेखालील या त्रिस्तरीय समितीत जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण अधिकारी तुषार जाधव आणि अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. शशिकांत पवार यांचा समावेश होता. या समितीने जिल्ह्यातील अकोला, अकोट, तेल्हारा, बाळापूर, बार्शीटाकळी, पातूर आणि मूर्तिजापूर या सातही तालुक्यांतील संवर्ग १ व २ च्या बदली प्रकरणांची सखोल चौकशी केली. शासन निर्णयानुसार प्रमाणपत्रांची तपासणी तालुकास्तरीय त्रिस्तरीय समितीने करणे अनिवार्य होते. बाळापूर, तेल्हारा, पातूर व मूर्तिजापूर या चार तालुक्यांनीच इतिवृत्त सादर केले. तर अकोला, अकोट आणि बार्शीटाकळी या तालुक्यांनी अशी कोणतीही अंमलबजावणी केली नसल्याचे आढळले. इतिवृत्त सादर केले नाही. तालुका स्तरावरील या अधिकाऱ्यांना कोणाचा पाठिंबा होता असा प्रश्न आता विचारला जात आहे. या सर्व प्रकरणात वरिष्ठ अधिकाऱ्यांचा थेट संबंध असल्याचे चित्र असून तालुका स्तरावरील अधिकाऱ्यांना चौकशी समितीला असहकार्य करा असा तोंडी आदेश दिला कोणी याचा तपास मुख्य कार्यकारी अधिकारी करतील काय अशी विचारणा होत आहे. या प्रकरणात आज आ. हरिश पिंपळे हे पोलिस अधीक्षकांची भेट घेत संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी करणार आहे.

### तक्रारी आणि गंभीर आरोप

गणेश गजाननराव कुरई यांच्या तक्रार अर्जाच्या आधारे या चौकशीला गती मिळाली होती. तक्रारदाराने आरोप केला होता की, अनेक शिक्षकांनी बोगस युडीआयडी प्रमाणपत्रे, बनावट वैद्यकीय प्रमाणपत्रे, पती-पत्नी एकत्रीकरणासाठी अंतराचे खोटे दाखले, तसेच घटस्फोट व परितत्त्याचे बनावट प्रमाणपत्र सादर करून संवर्ग १ व २ अंतर्गत लाभाचा गैरवापर केला. या प्रकारामुळे खरोखरच पात्र असलेले दिव्यांग शिक्षक हक्काच्या बदल्यांपासून वंचित राहिले आणि दिव्यांग हक्क अधिनियम २०१६ चे उल्लंघन झाले. याप्रकरणी भारतीय न्याय संहिता कलम ३१८ (फसवणूक) आणि माहिती तंत्रज्ञान कायदा ६६ अन्वये फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणीही करण्यात आली होती.

### चौकशी समितीचे मुख्य निष्कर्ष:

१ मूळ दस्तऐवजांचा अभाव: गटशिक्षणाधिकाऱ्यांनी चौकशी समितीसमोर मूळ अभिलेख सादर केले नाहीत. केवळ अप्रमाणित छायांकित प्रती सादर केल्यामुळे अहवालाच्या अंतिम सत्यतेची हमी देणे अशक्य असल्याचे समितीने स्पष्ट केले.

२ अद्ययावत प्रमाणापत्रांची उणीव: अनेक प्रकरणांमध्ये शिक्षकांनी जुन्या तारखेची वैद्यकीय प्रमाणपत्रे जोडली होती. संबंधित शिक्षक सध्या आजारमुक्त आहेत की नाही, याची कोणतीही पडताळणी गटशिक्षणाधिकाऱ्यांनी केली नव्हती.

३ शासकीय नियमांचे उल्लंघन: १८ जून २०२४ च्या शासन निर्णयानुसार प्रमाणपत्रांची तपासणी तालुकास्तरीय त्रिस्तरीय समितीने करणे अनिवार्य होते. बाळापूर, तेल्हारा, पातूर व मूर्तिजापूर या चार तालुक्यांनीच इतिवृत्त सादर केले. तर अकोला, अकोट आणि बार्शीटाकळी या तालुक्यांनी अशी कोणतीही अंमलबजावणी केली नसल्याचे आढळले.

४ मुदतीनंतरची प्रमाणपत्रे: अनेक शिक्षकांनी लाभासाठी ठरवून दिलेल्या अंतिम दिनांकाच्या नंतरची प्रमाणपत्रे सादर केल्याने ती लाभासाठी अयोग्य असल्याचे समितीने नमूद केले.

५ चौकशीदरम्यान काही अधिकाऱ्यांनी असहकार दर्शविल्याचे आणि सार्वजनिक बांधकाम विभागाने अंतराच्या पडताळणीबाबत प्रतिसाद दिला नसल्याचेही अहवालात स्पष्ट करण्यात आले आहे.

# मुख्यमंत्री फडणवीस-शिंदेंच्या 'कोल्डवॉर'मध्ये मराठ्यांचा जीव जातोय!

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**मुंबई :** एकनाथ शिंदे यांना स्वतःला मराठा मॅन म्हणून प्रस्थापित करण्याची असलेली घाई, त्यातून घेतलेले निर्णय, शिंदे आणि फडणवीस या दोघांमधील कोल्ड वॉर अतिशय टोकाच्या बिंदूला पोहोचले आहे. फडणवीस शिंदेंवर कुरघोडी करण्याची एकही संधी सोडत नाहीत, असा खोचक टोला ठाकरे सेनेच्या उपनेत्या सुषमा अंधारे यांनी लगावला. मराठा आरक्षणावरून त्यांनी जोरदार टीका केली. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर बोलताना सुषमा अंधारे म्हणाल्या की, सात-आठ महिन्यांपूर्वी आझाद मैदानावरून आंदोलक परतले, तेव्हाच सरकारच्या नियतीवर शंका उपस्थित केली होती. एकनाथ शिंदे यांना स्वतःला 'मराठा मॅन' म्हणून प्रस्थापित करण्याची अतिशय घाई झाली होती. त्या घाईतूनच अतिशय अगतिकतेने काही निर्णय घेतले गेले. पुढे बोलताना त्या म्हणाल्या, सध्या शिंदे आणि फडणवीस यांच्यात छुपा राजकीय संघर्ष पेटला आहे. फडणवीस हे शिंदे यांना शह देण्याची किंवा त्यांच्यावर कुरघोडी करण्याची एकही संधी सोडत नाहीत. त्यामुळे मराठा आरक्षणाच्या संदर्भाने जर शिंदे भूमिका काही घेणार असतील, तर फडणवीस ती भूमिका घेऊ देतील, ते फडणवीस कसले? पण मुळात फडणवीसांच्या भूमिकेवर जर शिंदेंची भूमिका अवलंबून असतील, तर शिंदेंनी मराठा समुदायाला एक पोकळ शब्द दिलाच का बरं? एकूणच काय तर दोघांचं राजकारण होतंय, जीव मात्र मधल्यामध्ये गरीब मराठ्यांचा जातोय, असा आरोप त्यांनी केला.



## ८० लाख नावे वगळण्याचा डाव

**नाशिक :** राज्यात सुरू असलेल्या मतदार यादी सखोल पुनरीक्षण (एसआयआर) मोहिमेत विरोधकांची जवळपास ८० लाख नावे मतदार यादीतून वगळण्याचे षडयंत्र रचले जात आहे. त्यामुळे सजग राहून मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेवर लक्ष ठेवण्याच्या सूचना मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शहर आणि ग्रामीणच्या पदाधिकाऱ्यांना केली आहे. मतदार यादीतून नावे कशी गायब केली जातात, याची उदाहरणे सादर करत मतदार यादीवर चौकसपणे लक्ष ठेवून 'बीएलए'ची संख्या अधिकाधिक वाढविण्याचे निर्देश ठाकरे यांनी पदाधिकाऱ्यांना दिले.

# सरसंघचालक श्री.गजानन महाराजांच्या चरणी नतमस्तक

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**शेगाव :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत आज श्री क्षेत्र शेगाव येथे दाखल झाले असून, त्यांनी श्री संत गजानन महाराज यांच्या समाधीचे दर्शन घेऊन त्यांनी आपल्या दोन दिवसीय दौऱ्याचा उत्साही वातावरणात प्रारंभ केला. शेगाव आणि खामगाव येथे आयोजित विविध सामाजिक व संघटनात्मक कार्यक्रमांच्या पार्श्वभूमीवर त्यांचा हा दौरा विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. कार्यक्रमांचा श्रीगणेशा करताना सरसंघचालकांनी सर्वप्रथम 'श्रीं'च्या चरणी माथा टेकवून आशीर्वाद घेतले. मंदिरात आगमन होताच श्री गजानन महाराज संस्थानच्या वतीने दादासाहेब पाटील यांनी त्यांचे परंपरेनुसार स्वागत केले व भेट घेतली. समाधीचे दर्शन आणि आरती घेतल्यानंतर सरसंघचालक मोहन भागवत हे पुढील नियोजित कार्यक्रमांसाठी खामगावच्या दिशेने रवाना झाले आहेत. त्यांच्या दौऱ्यामुळे स्वयंसेवक आणि भाविकांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे.



### सरसंघचालकांच्या हस्ते इनडोअर ऑडीटोरियम व स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे उद्घाटन

खामगाव : अमनोरा येस फाउंडेशन (सिटी ग्रुप) द्वारे संचलित आणि डॉ. प. पू. भय्यूजी महाराज प्रणित सद्गुरू दत्त धार्मिक आणि पारमार्थिक ट्रस्टच्या 'सूर्योदय पारधी समाज आदिवासी आश्रम शाळे'मध्ये नवीन सुविधांचे लोकार्पण करण्यात येणार आहे. आश्रमशाळेच्या प्रांगणात उभारण्यात आलेल्या नूतन 'बंदिस्त सभागृह' आणि 'स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स' चा भव्य उद्घाटन सोहळा शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता पार पडणार आहे. हा सोहळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या शुभहस्ते संपन्न होणार आहे. कार्यक्रमाला मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव, राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर, आदिवासी विकास मंत्री प्रा. डॉ. अशोक उईके आदींची उपस्थिती राहणार आहे. सद्गुरू दत्त धार्मिक आणि पारमार्थिक ट्रस्टच्या या आश्रमशाळेस अमनोरा येस फाउंडेशनतर्फे गेली ११ वर्षे अखंडपणे सहकार्य व पाठबळ दिले जात आहे. या आश्रमशाळेत पारधी व आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना केवळ पारंपरिक शिक्षणच दिले जात नसून, त्यांना स्वावलंबी व सक्षम बनवण्यासाठी क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातही प्रोत्साहन दिले जाते. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून या आधुनिक क्रीडांगण व बंदिस्त सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे.या सोहळ्याचे निमंत्रक म्हणून डॉ. आयुषी देशमुख (अध्यक्ष, सद्गुरू दत्त धार्मिक एवं पारमार्थिक ट्रस्ट, इंदूर) आणि श्री. अनिरुद्ध देशपांडे (अध्यक्ष, अमनोरा, येस फाउंडेशन - सिटी ग्रुप, पुणे) यांनी नागरिकांना व उपस्थितांना या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्याचे आवाहन केले आहे.

# मोदी सरकारची मोहीम फत्ते!

वृत्तसंस्था ७ ऑगस्ट

**दिल्ली :** मतदारसंघ पुनर्रचना विधेयकावर पहिल्यांदा संसदेत दारूण पराभव झाल्यानंतर आता केंद्र सरकारकडून नव्याने आणण्याचे प्रयत्न सुरु झाले आहेत. यासाठी आवश्यक दोन तृतियांश बहुमताचा कोटा पूर्ण झाल्याचा दावा सूत्रांनी केला आहे. दोन दिवसांपूर्वी संसदीय कामकाज मंत्री किरण रिजिजू यांनी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांची भेट घेत यासंदर्भात चर्चा केली होती. मात्र, काँग्रेसने साफ शब्दात नकार दिला होता.

सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार नोव्हेंबर महिन्यात उत्तर प्रदेशातील राज्यसभा खासदार निवृत्त होणार आहेत, ज्यामुळे हिवाळी अधिवेशनात हे विधेयक आणणे सोयीचे ठरणार नाही. त्यामुळे याच चालू अधिवेशनाच्या शेवटच्या आठवड्यात हे विधेयक मंजुरीसाठी आणि मतदानासाठी आणण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी राहुल गांधी आणि प्रियंका गांधी यांची भेट घेऊन स्वतंत्र चर्चा केली, पण त्यांनी थेट नकार देत पहिल्यांदा जंतरमंतरवरील लाठीमार आणि राम मंदिर लुटीवर चर्चेची मागणी केली आहे.

संविधानातील तरतुदीनुसार घटना दुरुस्तीसाठी उपस्थित आणि मतदान करणाऱ्या सदस्यांचे दोन तृतीयांश बहुमत आवश्यक असते. बहुमताचे गणित जुळवण्यासाठी सरकार काही सत्ताधारी खासदारांना तटस्थ किंवा अनुपस्थित राहण्यास सांगण्याची शक्यता आहे.

या घटना दुरुस्ती विधेयकामुळे लोकसभेतील मतदारसंघांची संख्या वाढणार आहे. मतदारसंघांची पुनर्रचना होऊन त्यांच्या सीमा बदलणार आहेत. प्रत्येक राज्यातील खासदार आणि आमदारांची संख्या देखील बदलू शकते.



## दोन तृतीयांश मतांची जुळवाजुळव पूर्ण, जेन झी आंदोलनाच्या आड कार्य सिद्धीस

१ १९७१ च्या जनगणनेनुसार सध्या असलेली जागांची मर्यादा आणखी २५ वर्षांसाठी तशीच कायम ठेवावी.

२ सर्व राज्यांसाठी लोकसभेच्या जागांमध्ये ५० टक्क्यांची समान वाढ करण्यासाठी घटनेत दुरुस्ती करावी. (गृहमंत्री अमित शाह यांनी एप्रिलमध्ये याविषयी दिलेले तोंडी आश्वासन कायद्यात समाविष्ट करावे.

३ कायद्याच्या मसुद्यात प्रत्येक राज्याला नेमक्या किती जागा मिळतील, याचा स्पष्ट उल्लेख असणारी अनुसूची जोडली जावी.

---

### संसदेतील राजकीय व संख्याबळाचे गणित

घटनादुरुस्ती विधेयक मंजूर करण्यासाठी सरकारला दोन-तृतीयांश (२/३) बहुमताची गरज आहे. म्हणजेच ३६० मतांची गरज आहे. डीएमकेचे २२ खासदार सोबत आले, तर सरकारचे संख्याबळ ३४६ पर्यंत पोहोचू शकते. राज्यसभेत सर्व २४४ खासदार उपस्थित राहिल्यास १६४ मतांची गरज आहे, जिथे एनडीएकडे सध्या १५८ खासदार आहेत. महिलांसाठीच्या ३३ टक्के आरक्षणाची अंमलबजावणी करण्यासाठी लोकसभेतील एकूण जागांची संख्या ८५० पर्यंत वाढवण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

# जातीय जनगणनेत ओबीसी कॉलमचा समावेश होईल - मुख्यमंत्री फडणवीस

## राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या अधिवेशनाला सुरुवात

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

मुंबई : जातीय जनगणनेत ओबीसी कॉलमचा समावेश केला जाईल. त्याशिवाय अधिवेशनातील ठराव राज्य सरकार अंमलात आणेल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच 'ओबीसी महासंघाच्या ११ व्या अधिवेशनासाठी देशभरातून आलेले सर्व समाजातील प्रतिनिधी, माता-भगिनी, युवा सहकारी, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे सर्व पदाधिकारी यांना माझा नमस्कार', असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

ते पुढे म्हणाले, आज बंगळुरुमध्ये राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ११ वे अधिवेशन संपन्न होत आहे. सामाजिक न्याय आणि ओबीसींच्या हक्कांवर यामध्ये व्यापक चर्चा होईल. विविध मान्यावर या अधिवेशनाला मार्गदर्शन करणार आहेत. 'महत्वपूर्ण अधिवेशनाच्या यशस्वी आयोजनासाठी मी राष्ट्रीय ओबीसी महासंघाला शुभेच्छा देतो.

हे अधिवेशन फक्त विचार-विनिमय करण्याचा मंच नाही, तर सामाजिक न्याय, समरसता आणि राष्ट्रीय निर्माणाला नवीन दिशा देण्याची संधी आहे' असं मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

'भारताचा आत्मा विविधतेत आहे. या विविधतेला शक्ती देणारा आधार सामाजिक समरसता आहे. आपल्या महापुरुषांनी भारत निर्माणाचा आपल्याला असा मार्ग दाखवला, ज्यात कुठल्याही व्यक्तीचं मूल्य त्याची जाती, पार्श्वभूमीवर यावर न ठरता प्रतिभा, चरित्र यावर ठरेल. महात्मा ज्योतिबा फुले यांनी आधुनिक भारतात सामाजिक क्रांतीचा शंखनाद केला. शिक्षणाला सामाजिक परिवर्तनाचं सर्वात प्रभावी माध्यम बनवलं. शोषित, वंचित आणि मागास समाजाला आत्मसन्मना, अधिकार आणि समान संधी देण्यासाठी जीवन समर्पित केलं. शिक्षण मुक्तीचा मार्ग आहे हे आजही प्रासंगिक आहे. हाच सामाजिक न्यायाचा मजबूत पाया आहे' असं देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

सिटी न्यूज सुपरफास्ट विविधा

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# हेल्मेट सक्तीचा खेळ खंडोबा होवू नये

दुचाकीस्वारांच्या जीविताच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हेल्मेट सक्ती लागू करण्यात आली. याला मुळीच विरोध नाही. हेल्मेट न घालणाऱ्यांवर पोलीस प्रशासनातर्फे दंडात्मक कारवाई करण्यात येत आहे. वृत्तपत्रात प्रकाशित झालेली बातमी वाचली. नाशिक नंतर ठाणे जिल्ह्यात रस्त्यावरील जीवघेण्या खड्ड्यांमुळे घडलेल्या वेगवेगळ्या अपघातात दोन जण मृत्युमुखी पडले. त्यात एक ठाणे डिस्ट्रिक्ट रेस्क्यू फोर्स चा (टि डी आर एफ) जवान आहे. रस्ते अपघातात जीविताच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेट घालणं आवश्यक आहे. हे मान्य आहे. खराब रस्ते, रस्त्यांवरील अतिक्रमण, रस्त्यांवर पार्किंग करण्यात आलेली वाहनं, अनियंत्रित वेगानी धावणारी वाहनं, कठडे नसलले पुल रस्त्याच्या बाजूला असलेल्या उघड्या नाल्या, वहातुकीला अडथळा निर्माण



करणारे वीजेचे खांब, रस्त्यांवर फिरणारी मोकाट जनावरं. हे रस्त्यावरील अपघात घडण्याची प्रमुख कारणं आहेत. वाहतुकीच्या नियमांचे पालन न करणे, तसेच दुचाकी चालवतांना धाडसी खेळ केल्यामुळे देखिल अपघात घडतात. अपघात घडल्यानंतर दुचाकीस्वाराच्या डोक्याला गंभीर इजा होवू नये म्हणून, हेल्मेट घालावे हा झाला उपाय.

परंतू अपघाताचे प्रमाण कमी व्हावे या दृष्टीने प्रामाणिकपणे प्रयत्न होणे आवश्यक आहे. वर्दळीच्या ठिकाणी उभ्या करण्यात येत असलेल्या ऑटोरिक्षा, रस्त्यावर पार्किंग केलेली वाहनं, वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणारे वाहनचालक यांच्यावर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करावी. पोलीस प्रशासनातर्फे बऱ्याच मुख्य चौकात सी सी टिव्ही कॅमेरा लावण्यात आले आहेत. सर्व वर्दळीच्या ठिकाणी कॅमेरा लावण्याची व्यवस्था करावी. म्हणजे बसल्या जागेवरून वाहतूक नियंत्रण आणि कारवाई करता येईल. मनुष्यबळाचा वापर आणि ताण काही अंशी कमी होईल. महानगरपालिकेने रस्त्यांवरील अतिक्रमण हटवावे. पाइपलाइन, केबल टाकण्यासाठी, भूमिगत गटारा साठी खोदकाम केलेले तसेच आपल्या अखत्यारीतील खराब असलेले रस्ते नवीन बनवावे, अथवा दुरुस्त करावे. उघड्या नाल्यांवर झाकण टाकावे. महावितरण कंपनीने वाहतुकीस अडथळा निर्माण करणारे खांब आणि रोहित्र हटवावे. सार्वजनिक बांधकाम विभागाने आपल्या अखत्यारीतील रस्ते व्यवस्थित ठेवावे, कठडे नसलेल्या पुलांना ते बसवावे. यात प्रादेशिक परिवहन विभागाची (आर टी ओ) ची भूमिका देखील महत्वाची आहे. सर्व विभागांनी सांघिकपणे आणि परस्पर सामंजस्याने काम केल्यास रस्त्यांवरील अपघाताचे प्रमाण कमी होऊ शकते. वाहनांना बसवायच्या हाय सेक्युरीटी रजिस्ट्रेशन प्लेट सारखा, हेल्मेट सक्तीचा खेळ खंडोबा होवू नये. हि अपेक्षा आहे. नाहीतर 'एक ना धड, भाराभर चिंध्या', असे व्हायचे.

**हेमंत जकाते**
अकोला

# ‘लिटिल बॉय’ पडला अन् अवघ्या जगाने विध्वंस पाहिला!

तब्बल ८१ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी, म्हणजेच ६ ऑगस्ट १९४५ रोजी हिरोशिमावर ‘लिटिल बॉय’ नावाचा अणुबॉम्ब टाकला गेला होता. अमेरिकेने केलेल्या या हल्ल्याचा विध्वंस अवघ्या जगाने पाहिला होता. इतकंच नाही तर, जपानचे हे शहर अशाप्रकारे उद्ध्वस्त झाले की, पुढच्या कैक पिढ्यांना त्याचे परिणाम भोगावे लागले. ही घटना मानवी इतिहासातील सर्वात विनाशकारी घटनांपैकी एक होती. सकाळी ८.१५ वाजता झालेल्या या हल्ल्यामुळे हिरोशिमा क्षणात होत्याचं नव्हतं झालं. या हल्ल्यात तब्बल १ लाख ४० हजार लोक मृत्युमुखी पडले, तर बचावलेल्यांना किरणोत्सर्गाचे दीर्घकालीन दुष्परिणाम सहन करावे लागले. या दुर्घटनेने अण्वस्त्र किती खतरनाक आहेत, याची जगाला जाणीव करून दिली. आजही या घटनेच्या आठवणी लोकांच्या मनात ताज्या आहेत.

दरवर्षी ६ ऑगस्ट रोजी ‘हिरोशिमा दिवस’ साजरा केला जातो. जंगल शांती, अहिंसा आणि जागतिक एकतेचा संदेश देणं, हा या दिवसाचा उद्देश आहे. हिरोशिमाची घटना ही केवळ एक ऐतिहासिक सत्य नाही, तर मानवतेसाठी एक खोल इशारा आहे. युद्ध आणि हिंसाचाराचे परिणाम फक्त विनाशकारी आणि दुःखद आहेत, हे याने दिवसाने सगळ्यांना दाखवून दिले. हा दिवस आपल्याला अणु निःशस्त्रीकरण आणि जागतिक शांततेचे महत्त्व पटवून देणारा आहे. या घटनेच्या तब्बल ८१ वर्षांनंतरही आजच्या दिवशी म्हणजेच ६ ऑगस्ट रोजी अनेक लोक हिरोशिमा येथील शांतता स्मारकाजवळ एकत्र जमतात आणि श्रद्धांजली वाहतात. यासोबतच जगभरात शांती नांदावी यासाठी प्रार्थना करतात. हिरोशिमा दिन हा पर्यावरण संरक्षण, मानवी हक्क आणि अहिंसेबद्दल जागरूकता निर्माण करण्याचा दिन आहे.

**युद्धाची पार्श्वभमी**

दुसऱ्या महायुद्धाच्या अखेरच्या दिवसांमध्ये , ६ आणि ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर अनुक्रमे दोन अणुबॉम्ब टाकले . या हवाई बॉम्बहल्ल्यांमध्ये दीड लाख ते दोन लाख चाळीस हजार लोक मारले गेले, ज्यापैकी बहुतेक नागरिक होते. सशस्त्र संघर्षात अणुबॉम्बचा हा पहिला आणि एकमेव वापर आहे . दुसऱ्या महायुद्धाच्या शेवटच्या वर्षात, मित्र राष्ट्रांनी जपानच्या मुख्य भूमीवर एका मोठ्या खर्चाच्या आक्रमणाची तयारी केली. या मोहिमेपूर्वी पारंपरिक बॉम्बहल्ला आणि आग लावणाऱ्या बॉम्बहल्ल्यांची मोहीम राबवण्यात आली, ज्यात टोकियोवरील कारवाईसह जपानची ६४ शहरे उद्ध्वस्त झाली. ८ मे १९४५ रोजी जर्मनीने शरणागती पत्करल्यावर युरोपमधील युद्ध संपले आणि मित्र राष्ट्रांनी आपले संपूर्ण लक्ष पॅसिफिक युद्धाकडे वळवले. जुलै १९४५ पर्यंत, मित्र राष्ट्रांच्या मॅनहॅटन प्रकल्पाने दोन प्रकारचे अणुबॉम्ब तयार केले होते: ‘ लिटल बॉय ‘, एक समृद्ध युरेनियम गन-टाइप फिशन शस्त्र , आणि ‘ फॅट मॅन ‘, एक प्लुटोनियम इम्प्लोजन-टाइप अणुबॉम्ब. अमेरिकन आर्मी एअर फोर्सेसच्या ५०९ व्या कंपोझिट ग्रुपला बोईंग बी-२९ सुपरफोर्ट्रेसच्या विशेष सिल्व्हरप्लेट आवृत्तीने प्रशिक्षित करून सुसज्ज करण्यात आले आणि मारियाना बेटांमधील टिनियन येथे तैनात करण्यात आले . मित्र राष्ट्रांनी २६ जुलै १९४५ रोजी पॉट्सडॅम जाहीरनाम्यात जपानच्या शाही सशस्त्र



दलांच्या बिनशर्त शरणागतीची मागणी केली , ज्याचा पर्याय ‘तात्काळ आणि संपूर्ण विनाश’ हा होता. जपान सरकारने या अल्टिमेटमकडे दुर्लक्ष केले . नागासाकीवरील बॉम्बहल्ल्यानंतर आणि सोव्हिएत युनियनने जपानविरुद्ध युद्धाची घोषणा करून मांचुरियावर आक्रमण केल्यानंतर सहा दिवसांनी, १५ ऑगस्ट रोजी जपानने मित्र राष्ट्रांसमोर शरणागतीची घोषणा केली. जपान सरकारने २ सप्टेंबर रोजी शरणागतीच्या करारावर स्वाक्षरी केली, ज्यामुळे युद्ध समाप्त झाले.

क्वेबेक करारानुसार आवश्यक असल्याप्रमाणे, बॉम्बहल्ल्यासाठी युनायटेड किंगडमची संमती मिळवण्यात आली आणि २५ जुलै रोजी अमेरिकी लष्कराचे कार्यवाहक चीफ ऑफ स्टाफ, जनरल थॉमस टी. हँडी यांनी हिरोशिमा, कोकुरा, निगाता आणि नागासाकीवर अणुबॉम्ब वापरण्याचे आदेश जारी केले. ही लक्ष्ये निवडण्यात आली कारण ती मोठी शहरी क्षेत्रे होती जिथे महत्त्वपूर्ण लष्करी तळही होते. ६ ऑगस्ट रोजी हिरोशिमावर ‘ लिटल बॉय’ बॉम्ब टाकण्यात आला. तीन दिवसांनंतर, नागासाकीवर ‘फॅट मॅन’ बॉम्ब टाकण्यात आला. पुढील दोन ते चार महिन्यांत, अणुबॉम्बहल्ल्यांच्या परिणामांमुळे हिरोशिमामध्ये ९०,००० ते १,६६,००० आणि नागासाकीमध्ये ६०,००० ते ८०,००० लोकांचा मृत्यू झाला; यापैकी जवळपास निम्मे मृत्यू पहिल्याच दिवशी झाले. त्यानंतर कित्येक महिने, भाजणे, किरणोत्सर्गामुळे होणारे आजार आणि इतर जखमांमुळे अनेक लोकांचा मृत्यू होत राहिला, त्यातच आजारपण आणि कुपोषणाची भर पडली. हिरोशिमामध्ये अंदाजे २४,००० सैनिकांची मोठी लष्करी तुकडी असूनही, मृतांपैकी सुमारे ९० टक्के नागरिक होते.

विद्वानांनी या बॉम्बस्फोटांचा त्यानंतरच्या जागतिक इतिहासाच्या आणि लोकप्रिय संस्कृतीच्या सामाजिक व राजकीय स्वरूपावर झालेल्या परिणामांचा सखोल अभ्यास केला आहे , आणि या बॉम्बस्फोटांचे नैतिक व कायदेशीर समर्थन, तसेच विशेषतः शीतयुद्धाच्या संदर्भात भू-राजकारणावरील त्यांच्या परिणामांबद्दल अजूनही बरीच चर्चा सुरू आहे . समर्थकांचा असा युक्तिवाद आहे की, कमीत कमी जीवितहानीसह युद्ध संपवण्यासाठी अणुबॉम्बस्फोट आवश्यक होते आणि त्यामुळे अखेरीस दोन्ही बाजूंची मोठी जीवितहानी टळली. तसेच, अणुयुद्ध टाळण्याच्या हितासाठी अणुशस्त्रांच्या प्रदर्शनामुळेच ‘ दीर्घ शांतता’ प्रस्थापित झाली, असा त्यांचा दावा आहे. याउलट, टीकाकारांचा असा युक्तिवाद आहे की, युद्ध संपवण्यासाठी हे बॉम्बस्फोट अनावश्यक होते आणि तो एक युद्धगुन्हा होता, ज्यामुळे नैतिक आणि तात्विक प्रश्न निर्माण होतात. तसेच, भविष्यात अणुशस्त्रांचा वापर अपेक्षेपेक्षा अधिक होण्याची शक्यता आहे आणि त्यामुळे अणुसंहार होऊ शकतो, असाही त्यांचा दावा आहे.

# नोबेल पारितोषिक जिंकणारे जगातील पहिले गैर-युरोपियन!

रवींद्रनाथ टागोर यांचा जन्म ७ मे १८६१ मध्ये झाला. ज्यांना गुरुदेव असे ही संबोधले जाते, हे एक ब्राह्मोपंथीय, चित्रकार, नाटककार, कादंबरीकार, बंगाली कवी, संगीतकार आणि समाजसुधारक होते. १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी यांच्या कार्यामुळे बंगाली साहित्य व संगीतात आमूलाग्र बदल घडून आला. अतिशय लोकप्रिय कविता असलेल्या गीतांजलीचे ते कवी होते, ज्याचे वर्णन ‘अगदी संवेदनशील, ताजे आणि सुंदर’ कविता असे केले जाते. ते १९१३ मध्ये नोबेल पारितोषिक जिंकणारे जगातील पहिले गैर-युरोपियन आणि साहित्यातील पहिले गीतकार बनले. टागोरांच्या काव्यात्मक गाण्यांकडे आध्यात्मिक आणि पारंपारिक म्हणून पाहिले गेले; तथापि, त्यांचे ‘सुंदर गद्य आणि जादुई कविता’ बंगालबाहेर फारसे ज्ञात नाहीत. बंगाली साहित्यावर रवीन्द्रनाथांचा एवढा प्रभाव लक्षात आहे की, बंगाली साहित्याची रवींद्रपूर्व व रवींद्रोत्तर अशी विभागणी करण्यात येते. त्यांना कधीकधी ‘बंगालचा बार्ड’ म्हणून संबोधले जाते. तसेच ते अत्यंत प्रतिष्ठित रॉयल एशियाटिक सोसायटीचे सदस्य होते. कोलकात्याच्या पिराली ब्राह्मण कुटुंबात जन्म झालेल्या रवीन्द्रनाथांनी वयाच्या ८व्या वर्षी पहिली कविता लिहिली़ वयाच्या १६व्या वर्षी त्यांनी भानुसिंह या टोपणनावाने बऱ्याचशा कविता लिहिल्या. १८७७ पर्यंत त्यांनी त्यांच्या खऱ्या नावाने लघुकथा आणि नाटके प्रकाशित केली. एक मानवतावादी, सार्वभौमवादी, आंतरराष्ट्रीयवादी म्हणून त्यांनी ब्रिटिश राजवटीचा विरोध केला. शांतिनिकेतनाची उभारणी, विस्तृत व उच्च दर्जाच्या साहित्याची निर्मिती व रवीन्द्रसंगीताचे सृजन हे रवीन्द्रनाथांचे प्रमुख जीवनकार्य होते. पारंपरिक शिक्षण केवळ पोपटपंची शिकवते या विचारातून शांतिनिकेतनाचा क्रांतिकारक प्रयोग त्यांनी राबवला.

रवीन्द्रनाथांनी रचलेली जन गण मन व आमार शोनार बांग्ला ह्या रचना अनुक्रमे भारत व बांग्लादेश यांची राष्ट्रगीते म्हणून स्वीकारण्यात आल्या आहेत. दोन राष्ट्रगीतांचे जनकत्व असलेले रवीन्द्रनाथ हे पृथ्वीवरील एकमेव कवी आहेत. श्रीलंकेचे राष्ट्रगीतही त्यांच्या साहित्यातून प्रेरणा घेऊन तयार झाले. कोलकात्याच्या जोराशंका ठाक़ूर बाडी येथे रवींद्रनाथ टागोर (टोपणनाव रवि) यांचा जन्म झाला. वडील देवेन्द्रनाथ टागोर (१८१७-१९०५) व आई शारदा देवी (१८३० - १८७५) यांच्या १४ अपत्यांमध्ये रवींद्रनाथ हे १३वे होत. ११ व्या वर्षी मुंज झाल्यावर रवींद्रनाथांनी वडिलांसोबत १४ फेब्रुवारी १८७३ रोजी भारतभ्रमणार्थ कलकत्ता सोडले. या भ्रमंतीत त्यांनी विविध ठिकाणे पाहिली. वडिलांची शांतिनिकेतन येथील मालमत्ता (येथे आता आजचे विश्वभारती विद्यापीठ आहे), अमृतसर व हिमालयातील थंड हवेचे ठिकाण डलहौसी इत्यादी. येथे रवींद्रनाथांनी विविध व्यक्तींची आत्मचरित्रे वाचली, इतिहास, खगोलशास्त्र, विज्ञान , कालिदासाचे काव्य व संस्कृत आदींचे अध्ययन केले.



**आज रविंद्रनाथ टागोर यांचा स्मृतिदिन**

**महात्मा गांधी व रवीन्द्रनाथ**

१९०१ साली रवीन्द्रनाथ सियाल्दा सोडून शांतिनिकेतन येथे राहण्यास आले. एका आश्रमाची स्थापना करणे हा त्यांचा उद्देश होता . या आश्रमात त्यांनी एका प्रार्थना-गृहाची, प्रयोग-शील शाळेची, बागबगिचा व ग्रंथालयाची स्थापना केली.ड२़० रवीन्द्रनाथांच्या पत्?नीचा व दोन मुलांचा मृत्यू येथेच झाला. वडिलांचे देहावसान १९-जाने-१९०५ला घडले व वारसदार म्हणून रवींद्रनाथांन नियमित मासिक उत्पन्न मिळू लागले. याशिवाय त्यांना त्रिपुराच्या महाराजांकडून आर्थिक साहाय्य, कौंटुबिक दागदागिने व पुरी,ओडिशा येथील बंगला विकून काही प्राप्ती झाली. या काळात त्यांचे साहित्य बंगाली व विदेशी वाचकांचे आधिकाधिक लक्ष खेचू लागले होते. नैवेद्य (१९०१) व खेया (१९०६) या रचना या काळात प्रकाशित झाल्या. १४-नोव्हे.-१९१३ रोजी स्वीडिश अकादमीचा नोबेल पुरस्कार प्राप्त झाल्याची बातमी रवीन्द्रनाथांना समजली. गीतांजली या रचनेबद्दल त्यांना हा पुरस्कार देण्यात आला होता. गीतांजलीचे भाषांतर स्वतः रवीन्द्रनाथांनीच केले होते.१९१५ साली त्यांना ब्रिटिश सरकारने ‘सर’ ही पदवी दिली. १९१९ च्या जालियनवाला बाग हत्याकांडानंतर त्यांनी ती सरकारला परत केली. १९२१ साली रवीन्द्रनाथ व कृषी-अर्थतज्ज्ञ लिओनार्ड के एल्महिर्स्ट् यांनी शांतिनिकेतन जवळील सुरूल येथे एका ग्रामीण पुनर्निर्माण संस्थेची स्थापना केली. याच संस्थेचे रवीन्द्रनाथांनी पुढे ‘श्री-निकेतन’ असे नामकरण केले. श्री-निकेतनच्या माध्यमातून महात्मा गांधींच्या प्रतिकात्मक स्वराज्य चळवळीला पर्याय देण्याचा त्यांनी प्रयत्न केला होता. ज्ञानसंवर्धनातून अज्ञानी व असहाय्य ग्रामीण भागाची सुटका होईल या उदेशाने त्यांनी विविध देशातील विद्वान, दाते व अधिकाऱ्यांस या उपक्रमात सहभागी करून घेतले. १९३० सालापासून त्यांनी भारतातील पराकोटीच्या जातीयतेविरुद्ध प्रचार सुरू केला. नाट्य-कविता यांद्वारे जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. केरळच्या गुरुवायुर मंदिरात दलितांना प्रवेश देण्यासाठी त्यांनी आवाहन केले.

**अखेरची वर्षे (१९३२-१९४१)**

जीवनाच्या शेवटच्या दशकात रवींद्रनाथ पूर्णपणे जनसन्मुख होते. त्यांची लोकप्रियता विशेषतः बंगालमध्ये शिखरावर होती. १५-जानेवारी-१९३४ रोजी बिहारमध्ये झालेल्या भूकंपाची, महात्मा गांधींनी ‘दलित अत्याचाराचा परमेश्वराने घेतला सूड’ अशी संभावना केली. या वक्तव्याचा रवींद्रनाथांनी निषेध केला. बंगालच्या आर्थिक व सामाजिक अवनतीबाबत व कोलकत्यातील भयावह दारिद्र्याबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. या दारिद्र्यावर केलेल्या मुक्तछंदातील १०० ओळींच्या कवितेचा प्रभाव सत्यजित रे यांच्या अपुर संसार ( अपूचे जग) या चित्रपटावरही पडलेला दिसतो. अखेरच्या काळात विज्ञानात रवींद्रनाथांनी विशेष रस घेतला. यातूनच त्यांच्या विश्वपरिचय या निबंधसंग्रहाची निर्मिती झाली. जीवशास्त्र, भौतिकी व खगोलशास्त्राचा त्यांनी केलेल्या अभ्यासाचा प्रभाव त्यांच्या कवितेवरही जाणवतो. या शेवटच्या काळात लिहिलेल्या काव्यरचना रवींद्रनाथांच्या काव्यरचनांत सर्वश्रेष्ठ मानण्यात येतात.


# भारताचे जलमानव राजेंद्र सिंह

राजेंद्र सिंह हे एक भारतीय जलसंरक्षक आणि पर्यावरणवादी आहेत. ‘भारताचे वॉटरमॅन’ म्हणूनही ओळखल्या जाणाऱ्या राजेंद्र सिंह यांना २००१ मध्ये मॅगसेसे पुरस्कार आणि २०१५ मध्ये स्टॉकहोम वॉटर प्राईज मिळाला आहे . ते ‘ तरुण भारत संघ ‘ (टीबीएस) नावाची एक स्वयंसेवी संस्था चालवतात, जिची स्थापना १९७५ मध्ये झाली . सरिस्का व्याघ्र प्रकल्पाजवळील थानागाझी तहसीलच्या होरी-भिकमपुरा गावात स्थित असलेल्या या स्वयंसेवी संस्थेने, थार वाळवंटाजवळ असलेल्या आपल्या अर्ध-शुष्क प्रदेशात, धीम्या नोकरशाही आणि खाणकाम लॉबीविरुद्ध लढण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तसेच जोहड, पावसाचे पाणी साठवण्याच्या टाक्या, बंधारे आणि इतर काळाच्या कसोटीवर उतरलेल्या तसेच नावीन्यपूर्ण तंत्रांचा वापर करून गावकऱ्यांना जल व्यवस्थापनाची जबाबदारी घेण्यास मदत केली आहे.

१९८५ मध्ये एकाच गावातून सुरुवात करून, गेल्या काही वर्षांत, टीबीएसने कोरड्या हंगामासाठी पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी ८,६०० हून अधिक जोहड आणि इतर जलसंधारण संरचना बांधण्यास मदत केली आहे. १,००० हून अधिक गावांमध्ये पाणी परत आणले आहे आणि राजस्थानमधील अरवरी, रुपारेल, सरसा, भगानी आणि जहाजवाली या पाच नद्यांचे पुनरुज्जीवन केले आहे. ते राष्ट्रीय गंगा नदी खोरे प्राधिकरणचे सदस्य आहेत, जे भारत सरकारने पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६ अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून गंगा (गंगा) साठी एक सक्षम नियोजन, वित्तपुरवठा, देखरेख आणि समन्वय प्राधिकरण म्हणून २००९ मध्ये स्थापन केले होते.

राजेंद्र सिंग यांचा जन्म ६ ऑगस्ट १९५९ मध्ये उत्तर प्रदेशातील बागपत जिल्ह्यातील मेरठजवळील दौला गावात झाला . ते सात भावंडांमध्ये सर्वात मोठे होते. त्यांचे वडील शेतकरी होते आणि ते गावातील त्यांच्या ६० एकर जमिनीची देखभाल करत असत आणि तिथेच राजेंद्र यांचे सुरुवातीचे शिक्षण झाले. त्यांच्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना १९७४ मध्ये घडली, जेव्हा ते अजून हायस्कूलमध्ये शिकत होते. गांधी पीस फाउंडेशनचे सदस्य रमेश शर्मा यांनी मेरठमधील त्यांच्या घरी भेट दिली. यामुळे तरुण राजेंद्रचे मन गाव सुधारणेच्या मुद्यांकडे वळले, कारण शर्मा यांनी गाव स्वच्छ केले, एक वाचनालय (ग्रंथालय) उघडले आणि स्थानिक संघर्ष मिटवण्यातही ते सामील झाले; लवकरच त्यांनी राजेंद्रला दारू निर्मूलन कार्यक्रमात सामील केले. दुसरा महत्त्वाचा प्रभाव शाळेतील इंग्रजी भाषेचे शिक्षक प्रताप सिंग यांचा होता, जे वर्गानंतर आपल्या विद्यार्थ्यांशी राजकारण आणि सामाजिक मुद्यांवर चर्चा करू लागले. याच वेळी १९७५ मध्ये आणीबाणी लागू झाली होती, ज्यामुळे त्यांना लोकशाहीच्या मुद्यांची जाणीव झाली आणि त्यांनी स्वतंत्र विचार तयार केले.

शिक्षण पूर्ण झाल्यावर, त्यांनी १९८० मध्ये सरकारी सेवेत प्रवेश केला आणि जयपूरमध्ये शिक्षणासाठी राष्ट्रीय सेवा स्वयंसेवक म्हणून आपल्या कारकिर्दीला सुरुवात केली, जिथून त्यांची राजस्थानमधील दौसा जिल्ह्यातील प्रौढ शिक्षण शाळांवर देखरेख करण्यासाठी नियुक्ती करण्यात आली. दरम्यान, ते तरुण भारत संघ (यंग इंडिया असोसिएशन) किंवा टीबीएस या संस्थेत सामील झाले, जी जयपूर विद्यापीठातील अधिकारी आणि विद्यार्थ्यांनी कॅम्पसमधील आगीच्या पीडितांना मदत करण्यासाठी स्थापन केली होती. त्यानंतर, तीन वर्षांनी जेव्हा ते संस्थेचे सरचिटणीस झाले, तेव्हा त्यांनी विविध समस्यांमध्ये गुंतलेल्या संस्थेवर ठोस परिणाम साधण्यात अपुरेपणाबद्दल प्रश्नचिन्ह उपस्थित केले. अखेरीस १९८४ मध्ये संपूर्ण मंडळाने राजीनामा दिला आणि संस्थेची जबाबदारी त्यांच्यावर सोपवली. त्यांनी हाती घेतलेल्या पहिल्या कामांपैकी एक



एक म्हणजे भटक्या लोहारांच्या गटासोबत काम करणे, जे गावोगाव फिरत असूनही त्यांना कोणाकडूनही फारसा पाठिंबा मिळत नव्हता. या अनुभवाने त्यांना लोकांसोबत मिळून काम करण्याची प्रेरणा दिली. तथापि, कामावर परतल्यावर, विकासात्मक समस्यांबद्दल वरिष्ठांची उदासीनता आणि मोठा प्रभाव पाडण्यात स्वतःची असमर्थता यामुळे तो अधिकाधिक निराश होत होता, म्हणून त्याने १९८४ मध्ये नोकरी सोडली. त्याने आपले सर्व घरगुती सामान २३,००० रुपयांना विकले आणि शेवटच्या थांब्यासाठी बसचे तिकीट काढले. तो राजस्थानच्या अंतर्भागात जाणाऱ्या बसमध्ये चढला, त्याच्यासोबत तरुण भारत संघाचे चार मित्र होते. शेवटचा थांबा अलवर जिल्ह्यातील थानागाझी तहसीलमध्ये असलेले किशोरी गाव होते आणि तो दिवस होता २ ऑक्टोबर १९८५. सुरुवातीला साशंकता दर्शवल्यानंतर, शेजारच्या भिकंपुरा गावातील गावकऱ्यांनी त्याला स्वीकारले आणि तिथे त्यांना राहण्यासाठी जागा मिळाली. लवकरच, त्याने जवळच्या गोपालपुरा गावात एक लहान आयुर्वेदिक औषधोपचाराचा व्यवसाय सुरू केला, तर त्याचे सहकारी गावांमध्ये शिक्षणाचा प्रचार करण्यासाठी बाहेर पडले.

राजेंद्र सिंह हा गावातील एक ज्येष्ठ नागरिक, मंगू लाल मीना यांना भेटला, ज्यांनी असा युक्तिवाद केला की ‘ग्रामीण राजस्थानमध्ये शिक्षणापेक्षा पाण्याची समस्या अधिक मोठी आहे’. त्यांनी त्याला शहरात येऊन, शिकून परत जाणाऱ्या ‘सुशिक्षित’ लोकांसारखे वागण्याऐवजी स्वतःच्या हाताने काम करण्याचा सल्ला दिला; नंतर त्याला जोहडावर काम करण्यास प्रोत्साहित केले गेले, जे पारंपरिकरित्या पावसाचे पाणी साठवण्यासाठी आणि भूजल पुनर्भरण करण्यासाठी वापरले जाणारे मातीचे बंधारे आहेत, हे तंत्र मागील दशकांमध्ये सोडून देण्यात आले होते. परिणामी, त्या भागात मागील पाच वर्षांपासून भूजल नव्हते आणि त्याला अधिकृतपणे ‘डार्क झोन’ म्हणून घोषित करण्यात आले होते. जरी राजेंद्रला स्थानिक शेतकऱ्यांकडून जलसंधारणाची पारंपरिक तंत्रे शिकायची होती, तरी त्याचे इतर शहरी मित्र हाताने काम करण्यास तयार नव्हते आणि त्यांनी मार्ग सोडला. अखेरीस, काही स्थानिक तरुणांच्या मदतीने त्याने अनेक वर्षांच्या वापराअभावी दुर्लक्षित पडलेल्या गोपालपुरा जोहडातील गाळ काढण्यास सुरुवात केली. त्या वर्षी जेव्हा मान्सून आला, तेव्हा जोहड भरला आणि लवकरच अनेक वर्षांपासून कोरड्या असलेल्या विहिरींमध्ये पाणी आले. गावकऱ्यांनी हातभार लावला आणि पुढील तीन वर्षांत, ते १५ फूट खोल केले.

सरिस्का अभयारण्याच्या सीमेवर असलेल्या थानागाझी तालुक्यात किशोरी-भिकमपुरा येथील तरुण आश्रम, तरुण भारत संघाचे मुख्यालय बनले. त्यांनी १९८६ मध्ये या भागातील गावांमधून आपली पहिली पदयात्रा सुरू केली, ज्यामध्ये गावांचे जुने बंधारे पुन्हा बांधण्यासाठी लोकांना शिक्षित केले जात होते. तरीही त्यांचे मोठे यश अजून यायचे होते, कारण १९८६ मध्ये २० किमी दूर असलेल्या गोपालपुरा येथील पदयात्रेतून आणि यशातून प्रेरणा घेऊन, भानोटा-कोल्याला गावातील लोकांनी श्रमदान करून आणि टीबीएस स्वयंसेवकांच्या मदतीने, कोरड्या पडलेल्या अरवरी नदीच्या उगमावर एक जोहड बांधला. त्यानंतर नदीच्या पाणलोट क्षेत्रात येणारी गावे पार करत, त्यांनी नदीच्या काठावर लहान मातीची धरणेही बांधली, ज्यातील सर्वात मोठे धरण अरवली पर्वतरांगांमध्ये असलेले २४४ मीटर लांब आणि ७ मीटर उंच सिमेंटचे धरण होते; अखेरीस जेव्हा धरणांची संख्या ३७५ झाली, तेव्हा ६० वर्षांहून अधिक काळ कोरडी राहिल्यानंतर १९९० मध्ये नदी पुन्हा वाहू लागली. तरीही हा लढा अजून संपलेला नव्हता; जोहड बांधूनही सरिस्का परिसरातील तलाव आणि सरोवरांमधील पाण्याची पातळी अपेक्षेप्रमाणे वाढली नाही. त्यांच्या लक्षात आले की, खाणकामगारांनी त्या भागातील खाणकाम पूर्ण झाल्यावर न बुजवलेल्या खड्डयांमधून कमी झालेले पाणी वाफेमुळे नाहीसे झाले होते. त्यानंतर कायदेशीर लढाई सुरू झाली; त्यांनी सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली, ज्याने १९९१ मध्ये अरवली पर्वतरांगेतील खाणकामावर बंदी घातली. त्यानंतर मे १९९२ मध्ये, पर्यावरण आणि वन मंत्रालयाच्या अधिसूचनेने अरवली पर्वतरांगेतील खाणकामावर पूर्णपणे बंदी घातली आणि सरिस्का अभयारण्याच्या बफर क्षेत्र व परिघामध्ये कार्यरत असलेल्या ४७० खाणी बंद करण्यात आल्या. हळूहळू टीबीएसने अभयारण्यात ११५ मातीच्या आणि सिमेंटच्या इमारती आणि बफर व परिघीय क्षेत्रात ६०० इतर इमारती बांधल्या. या प्रयत्नांना लवकरच यश आले, १९९५ पर्यंत अरावरी ही बारमाही नदी बनली. या नदीला ‘आंतरराष्ट्रीय नदी पुरस्कार’ प्रदान करण्यात आला आणि मार्च २००० मध्ये, तत्कालीन राष्ट्रपती के. आर. नारायणन यांनी गावकऱ्यांना ‘ डाऊन टू अर्थ — जोसेफ सी. जॉन पुरस्कार’ प्रदान करण्यासाठी या भागाला भेट दिली. पुढील वर्षांमध्ये, रुपारेल, सरसा, भगानी आणि जहाजवाली यांसारख्या नद्या अनेक दशके कोरड्या राहिल्यानंतर पुनरुज्जीवित झाल्या. या भागातील ओसाड गावे पुन्हा वसली आणि जयपूर, दौसा, सवाई माधोपूर, भरतपूर आणि करौली या शेजारच्या जिल्ह्यांमधील शेकडो दुष्काळग्रस्त गावांमध्ये शेतीची कामे पुन्हा सुरू करता आली, जिथे टीबीएसचे कार्य हळूहळू पसरले.

२००१ पर्यंत, टीबीएस ६,५०० चौरस किलोमीटर क्षेत्रात पसरले होते , ज्यात मध्य प्रदेश, गुजरात आणि आंध्र प्रदेशच्या काही भागांचाही समावेश होता. त्यांनी राजस्थानच्या ११ जिल्ह्यांतील ८५० गावांमध्ये पावसाचे पाणी गोळा करण्यासाठी ४,५०० मातीचे बंधारे किंवा जोहड बांधले होते आणि त्याच वर्षी त्यांना सामुदायिक नेतृत्वासाठी मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. अनेक ग्राम समुदायांनी पुनर्वनीकरणाचे काम हाती घेतले आहे आणि सामुदायिक संसाधनांची काळजी घेण्यासाठी विशेषतः ग्रामसभा स्थापन करण्यात आल्या आहेत. त्यांनी राजस्थानातील दुर्गम गावांमध्ये पाणी बचतीच्या पारंपरिक ज्ञानाबद्दल, भूगर्भातील जलस्तर टिकवण्यासाठी भूजल पुनर्भरण करण्याच्या निकडीबद्दल आणि नैसर्गिक संसाधनांवर सामुदायिक नियंत्रणाचे समर्थन करण्यासाठी पाणी पचायत किंवा जल संसदेचे आयोजन केले आहे. २००५ मध्ये, त्यांना जमनालाल बजाज पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. आयआयटी कानपूरचे पर्यावरणवादी जी. डी. अग्रवाल यांनी उपोषण सुरू केले असतानाही, २००६ मध्ये गंगा नदीची उगमस्थान असलेल्या भागीरथी नदीवरील वादग्रस्त लोहरीनाग पाला जलविद्युत प्रकल्प थांबवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. २००९ मध्ये, त्यांनी पर्यावरणवादी आणि स्वयंसेवी संस्थांच्या गटाच्या एका पदयात्रेचे ( वॉकॅथॉन ) नेतृत्व केले, जी मुंबई शहरातून लुप्तप्राय मिठी नदीच्या काठाने निघाली होती. जानेवारी २०१४ मध्ये, त्यांनी लोकांना नदी प्रदूषणमुक्त करण्याचे आवाहन करण्यासाठी त्र्यंबकेश्वर ते पैठणपर्यंत गोदावरी नदीच्या काठाने परिक्रमा केली. अलीकडेच त्यांनी मुंबईतील अणुऊर्जा नियामक मंडळात पाणी, त्याचे संवर्धन आणि पाण्याची मूल्ये या विषयावर व्याख्यान दिले.

सिटी न्यूज अकोला

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



# मूर्तिजापूर येथील शासकीय निवासस्थानांची दुरवस्था

## प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे कोट्यवधींची मालमत्ता धोक्यात

अनवर खान ७ ऑगस्ट

**मूर्तिजापूर :** शहरातील सिव्हिल लाईन परिसरात अनेक वर्षांपूर्वी विविध शासकीय निवासस्थानांची दुरवस्था झाली आहे. अनेक निवासस्थाने जीर्ण व मोडकळीस आली असून, काही इमारती वापराविना पडून आहेत. शासनाची कोट्यवधी रुपयांची मौल्यवान मालमत्ता अशा प्रकारे दुर्लक्षित राहणे ही गंभीर बाब असून, याकडे जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभागाने तातडीने लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.

काही शासकीय निवासस्थाने वापरण्यायोग्य राहिलेली नसून, काही ठिकाणी इमारतींच्या भिंती, छत, दरवाजे व इतर बांधकाम साहित्याची मोठ्या प्रमाणात पडझड झाल्याचे दिसून येते. त्यामुळे या परिसरातील शासकीय मालमत्तेची सुरक्षितता तसेच भविष्यातील वापराचा प्रश्न निर्माण झाला आहे. जीर्ण झालेल्या इमारतींची तातडीने तांत्रिक तपासणी करून त्या धोकादायक असल्यास पाडण्याची आणि त्या जागेचा योग्य नियोजनबद्ध पद्धतीने पुनर्विकास करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. सिव्हिल लाईन परिसरातील जुन्या व जीर्ण शासकीय निवासस्थानांचा सर्वंकष आढावा घेऊन शासनाने एकात्मिक शासकीय निवास संकुल उभारण्याचा विचार करणे आवश्यक आहे. उपलब्ध जागेचा योग्य वापर करून अत्याधुनिक व सुरक्षित इमारती उभारल्यास विविध शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांना एकाच परिसरात निवासाची सुविधा उपलब्ध होऊ शकते.



मूर्तिजापूर येथील सर्व शासकीय निवासस्थानांचे तातडीने सर्वेक्षण करून प्रत्येक इमारतीची सद्यस्थिती तपासावी. वापरण्यायोग्य असलेल्या इमारतींची तातडीने दुरुस्ती करावी, तर अत्यंत जीर्ण व धोकादायक इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यकतेनुसार त्या पाडून त्याच ठिकाणी नवीन अत्याधुनिक शासकीय निवासस्थानांची उभारणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

जिल्हाधिकारी मीना यांनी या गंभीर विषयाकडे विशेष लक्ष देऊन संबंधित विभागांची संयुक्त बैठक घेऊन मूर्तिजापूर येथील शासकीय निवासस्थानांचा आढावा घ्यावा. तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींनीही शासनाच्या संबंधित विभागांकडे हा प्रश्न मांडून निधी उपलब्ध करून घेण्यासाठी पुढाकार घ्यावा, अशी आहे.

# शहराला आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या धर्तीच्या प्रशासकाची गरज

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अकोट :** शहरात नियमांचे उल्लंघन होत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसून येत आहे. उघड्यावर मटण विक्री, अस्वच्छतेच्या वातावरणात सुरू असलेले मांस विक्रीचे व्यवहार, शाळांच्या परिसरात बंदी असलेल्या पदार्थांची विक्री, प्लास्टिकबंदीचा सर्रास भंग आणि काही बेकरी उत्पादनांबाबत उपस्थित होणारे प्रश्न यामुळे नागरिकांमध्ये चिंता वाढत आहे.

विशेष म्हणजे, शहरातील बहुतांश प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत. त्यामुळे या नियमभंगाच्या प्रकारांची सत्यता पडताळण्यासाठी प्रशासनाकडे सीसीटीव्ही फुटेज तपासण्याचा प्रभावी पर्याय उपलब्ध आहे. संबंधित विभागांनी फुटेजची पाहणी करून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी नागरिकांची मागणी आहे.



शहरात कत्तलखाना नसल्याने मास विक्री करता कापली जाणारे जनावरे ही व्यावसायिक त्याच ठिकाणी कापतात आजपर्यंत आम्ही कुठल्याही जनावराची तपासणी केलेली नाही व त्याकरिता कधी नगर परिषद आरोग्य विभागाने सहभाग घेतला नाही

**डॉ. अनिल किटकुले,** पशुवैद्यकीय अधिकारी अकोट

प्रशासनाने वेळोवेळी तपासणी मोहिमा राबवून अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि प्लास्टिकबंदीच्या नियमांची कठोर अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. अन्यथा नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित प्रश्न अधिक गंभीर होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

अकोट शहरात कायद्याची कठोर अंमलबजावणी, नियमित तपासण्या आणि कोणत्याही दबावाला बळी न पडणारे प्रशासन उभे राहण्याची गरज असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. त्यामुळे आयुक्त तुकाराम मुंडे यांच्या धर्तीच्या शिस्तबद्ध आणि धडक प्रशासनाची अकोट शहराला गरज असल्याची चर्चा शहरभर सुरू आहे.

# डॉ. विशू विलियम यांना ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार

**अकोट :** येथील ॲक्युपंक्चरिस्ट डॉ. विशू विलियम यांना आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन, एजीएमए मार्फत प्रतिष्ठेचा महा ॲक्युपंक्चर रत्न पुरस्कार २०२६ मोठया थाटात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण नाट्यगृह छत्रपती संभाजीनगर येथे देण्यात




आला. प्रमुख पाहुण्यांमध्ये मराठी सिने कलावंत डॉ. सुयोग गोऱ्हे, ॲड.नाझेर काझी प्र. अध्यक्ष अल्पसंख्यांक विभाग राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, ॲड. दत्तात्रय जाधवर, ॲड नागेश सोनुने, चेअरमन डॉ. सतीश कराळे,डॉ.नितीन राजे डॉ बाबुराव कानडे, डॉ. अभिजित कवठकर, प्रशांत सावंत, व आयुष इंटरनॅशनल मेडिकल असोसिएशन पदाधिकारी उपस्थित होते.

# राकेश टिकैत यांच्याकडून महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकास अभिवादन

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**पातूर :** देशातील प्रसिद्ध शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी आज पातूर शहराला भेट देऊन महात्मा ज्योतिबा फुले यांच्या स्मारकास अभिवादन केले. याप्रसंगी त्यांनी परिसरातील शेतकरी बांधवांशी संवाद साधला.

देशातील प्रसिद्ध शेतकरी नेते राकेश टिकैत यांनी आज पातूर परिसरातील महात्मा ज्योतिबा फुले स्मारकास भेट देऊन अभिवादन केले. सध्या



शेतकरी नेते राकेश टिकैत विदर्भ दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान शेतमालाला हमीभाव, वाढता उत्पादन खर्च, पीक विमा, नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांचे होणारे नुकसान, सिंचन, वीज वितरण आणि कर्जमाफी यांसारख्या शेतकरी हिताच्या विविध प्रश्नांवर ते चर्चा करत आहेत. शासनाने कृषी धोरणावर ठोस निर्णय घेतला पाहिजे, यासाठी आगामी आंदोलनाची दिशा ठरवण्याच्या उद्देशाने त्यांनी परिसरातील शेतकऱ्यांशी संवाद साधला. या प्रसंगी उपस्थित शेतकऱ्यांच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले. कार्यक्रमास मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# पाठ्यपुस्तक तुटवड्याची सीईओंकडून दखल

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अकोला :** जिल्ह्यातील अनेक खासगी अनुदानित प्राथमिक शाळांमध्ये मोफत पाठ्यपुस्तकांचा तुटवडा असल्याची बाब समोर आल्यानंतर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेत शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना तातडीने कार्यवाहीचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना पाठ्यपुस्तक वितरणाबाबतचा वस्तुनिष्ठ अहवाल तातडीने सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

भारतीय जनता पक्ष ओबीसी मोर्चाचे जिल्हाध्यक्ष मनीष गावंडे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांची भेट घेऊन जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांना अद्यापही मोफत पाठ्यपुस्तके मिळाली नसल्याची बाब निदर्शनास आणून देत निवेदन सादर केले होते. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक

### अहवाल सादर करण्याचे आदेश

नुकसान टाळण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली होती.

या निवेदनाची दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना तात्काळ कार्यवाहीचे निर्देश दिले. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व तालुक्यांतील सरकारी, जिल्हा परिषद, नगर परिषद व खासगी अनुदानित शाळांमधील पाठ्यपुस्तकांची मागणी, प्रत्यक्ष प्राप्त पुस्तके, तुटवडा, अतिरिक्त (Surplus) पुस्तके तसेच समायोजनाची माहिती निश्चित नमुन्यात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याबाबत मनीष गावंडे यांनी सांगितले की, "मोफत पाठ्यपुस्तके हा प्रत्येक विद्यार्थ्याचा मूलभूत हक्क आहे. पुस्तकांच्या अभावामुळे एकाही विद्यार्थ्याचे शैक्षणिक नुकसान होऊ नये. मुख्य कार्यकारी अधिकारी अनय नावंदर यांनी विद्यार्थीहित लक्षात घेऊन तातडीने कार्यवाहीचे आदेश दिल्याबद्दल त्यांचे आभार. जिल्ह्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला वेळेत पाठ्यपुस्तके मिळेपर्यंत भाजप ओबीसी मोर्चा सातत्याने पाठपुरावा करणार आहे." शिक्षण विभागाने मागविलेल्या अहवालानंतर जिल्ह्यातील प्रत्यक्ष तुटवड्याचे चित्र स्पष्ट होणार असून, ज्या शाळांमध्ये पाठ्यपुस्तकांची कमतरता आहे तेथे तातडीने पुस्तके उपलब्ध करून देण्यासाठी पुढील कार्यवाही केली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली.

# शेतकऱ्यांची पोलिसांनी केली उचलबांगडी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**हिवरखेड :** शासकीय कामात अडथळा निर्माण होऊ नये म्हणून शेतकऱ्यांची पोलिसांनी केली उचलबांगडी. हिवरखेड पोलिस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या ग्राम भोकर शेतशिवरात दिनांक ५ ऑगस्ट रोजी दुपारी रस्त्याचे शासकीय कामं सुरू असताना काही ठराविक शेतकऱ्यांची या कामात आळकाठी येऊ नये म्हणून हिवरखेड पोलिसांनी शेतकऱ्यांची उचलबांगडी केली होती, सदर रस्त्याचे काम भोकर काळेगाव मार्गावरील शेतशिवरात तेल्हारा तहसीलदार यांच्या आदेशाने पोलिस बंदोबस्तात करण्यात आले, या दरम्यान प्रकरण वाढू नये म्हणून पोलिसांनी नियमाचे पालन करत भोकर येथील ३ शेतकऱ्यांना ताब्यात घेतले सदर काम पूर्ण झाल्यानंतर पोलिसांनी शेतकऱ्यांना सुखरूप नातेवाईकांच्या स्वाधीन केले , तेल्हारा ठाणेदार संतोष इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली हिवरझेडचे पी एस आय गोपाल गिलबिले यांनी हे प्रकरण हाताळले, परंतु शेतकऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली असल्याचे समजते. शेतकरी आपला विषय सध्या जोरकसपणे मांडत आहेत. अशा वेळी त्यांची मुसकटदाबी करणे किती योग्य आहे असा सवाल देखील या अनुषंगाने उपस्थित केला जात आहे. तसेच घडलेल्या प्रकाराबाबत नाराजी आहे.

# सेंट पॉल पब्लिक स्कूल मध्ये शाळा स्थापना दिवस व गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अकोट :** सेंट पॉल पब्लिक स्कूलमध्ये शाळा स्थापना दिन व गुरुपौर्णिमा साजरी करण्यात आली. याकार्यक्रमाकरिता संस्थेचे अध्यक्ष नवनीत लखोटिया, उपाध्यक्ष लूणकरन डागा, सचिव प्रमोद चांडक, शारदा लखोटिया, रेखा चांडक, सुधा डागा ,दीपम लखोटिया, प्राचार्या डॉ.कविता मिश्रा ,समन्वयक अभिषेक गुजर, वेदवास गुरूच्या भूमिकेत अद्वैत बोचे व गुरुमां च्या भूमिकेत राजनंदिनी साबळे मंचावर उपस्थित होते.

या कार्यक्रमाची सरस्वती पूजनाने झाली. मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले . 'माता ही आपल्या जीवनातील प्रथम गुरु' या




प्रथेनुसार नर्सरी ते के.जी च्या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रथमगुरुचे पूजन केले. प्रवीण कुलट व पवन चिंचोळकर यांच्यासोबत वर्ग पाचवी व साहवीच्या विद्यार्थ्यांनी स्वागत पर गीत गायले . सिद्धार्थ अंभोरे यांच्या नेतृत्वाखाली सातवीच्या विद्यार्थ्यांनी गुरु-शिष्य संबंधावर अप्रतिम नृत्य सादर केले. उपस्थित सर्व महिला पालक वर्गांचे विविध खेळ घेण्यात आले, यामध्ये नर्सरीच्या पूजा पाखरे केजी वनच्या तृप्ती भगत आणि केजी टू च्या पल्लवी जायभये ह्या खेळाच्या विजेता ठरल्या. वर्ग सातवीची विद्यार्थिनी नेहा खोले हीने स्वागतपर भाषण केले.त्यानंतर के.जी.चे विद्यार्थी ऋग्वेद पोटे व विरा ताकोते यांनी गुरुपौर्णिमेबद्दल आपले विचार व्यक्त केले.शाळेच्या प्रा. कविता मिश्रा यांनी गुरुपौर्णिमेचे महत्व सांगितले. कार्यक्रमाचे संचालन गार्गी इंगळे व श्रेया कोरडे यांनी केले व आभार प्रदर्शन माही गुप्ता हिने केले.

## वाहतूक व्यवस्था सुधारल्यानंतर हेल्मेट सक्ती करा !

**अकोला :** जिल्ह्यात हेल्मेट सक्ती लागू करू नये तसेच नियमभंगाबाबत दंडात्मक कारवाई टाळावी, अशी मागणी बहुजन समाज पक्षाच्या अकोला जिल्हा शाखेने केली आहे. यासंदर्भात उपजिल्हाधिकारी राजेंद्र मालठाणे यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर करण्यात आले. शहरातील मूलभूत सुविधा आणि वाहतूक व्यवस्था सुधारल्यानंतरच हेल्मेट करावी, अशी मागणी बसपने केली आहे. तसेच १५ ऑगस्टपर्यंत हेल्मेट सक्तीबाबतचा आदेश मागे न घेतल्यास जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी नेते डॉ. धनंजय नालट, लोकसभा अध्यक्ष रमेश इंगळे बजरंगसिंग एललकार आदी उपस्थित होते.

## हिंगणी दानापूर मार्गावर बेवारस आधार कार्ड

हिवरखेड : ग्राम दानापूर _हिंगणी मार्गावरील शेतात आढळले अंदाजे चाळीस ते पन्नास आधार कार्ड. यामुळे नागरिकांन मध्ये स्म्रभ निर्माण झाला असून चौकशी करावी अशी मागणी जोर धरत आहे.


## जाहीर खुलासा

**जाहीर खुलासा देणार :-** महंत रामकिशोरदास गुरू जयरामदासजी
वय ७६ वर्षे, धंदा प्रवचन.
रा. खोलेश्वर मन्दिर, खोलेश्वर, अकोला.

**जाहीर खुलासा घेणार :-** ठाणेदार - सिटी कोतवाली अकोला.

**विषय :-** श्रीरामचंद्र खोलेश्वर मन्दिर अकोला र. क्र. ए ४१७.

यावर दि. ८-७-२०२६ रोजी दिलेल्या देशोन्नति दैनिक पत्र व तसेच दि. ९-७-२०२६ रोजी, लोकमत दैनिक पत्र व दैनिक भारकर मध्ये मिळून आले की, ठाणेदार सिटी कोतवाली अकोला पासुन व्यक्त केले की वि. आयुक्त धर्मादाय अमरावती पासुन परवानगी मिळाले असता, जाहीर खुलासा देणार वर गुन्हा दाखल ची परवानगी दिली असे लेख आहे.

परन्तु वि. सह धर्मादाय आयुक्त अमरावती यांनी रमेश गायकवाड आणि ठाणेदार जाहीर खुलासा घेणार यांची अर्ज अमान्य करता, ठुकरा दिला. आणि यांचे अर्ज चौकशी करिता उप धर्मादाय आयुक्त अकोला कडे, पाठविले असता, ठाणेदार जाहीर खुलासा घेणार यास जाहीर खुलासा देणार वर गुन्हा दाखल करण्याचे बद्दल अधिकार नाही, आणि त्या बद्दल जाहीर खुलासा देणार यांनी २२ जानेवारी २०२६ रोजी कलम ८० सी. पी. सी. चा नोटीस मानहानी करिता जाहीर नोटीस घेणार यास दिला असता दि. ९-७-२०२६ रोजी ६ पाना ची एक तक्रार अर्ज जाहीर खुलासा घेणार चे विरुद्ध माननीय डी. एस. पी. साहेब, अकोला समक्ष दिला आहे.

१. रमेश सुरेश गायकवाड आणि जाहीर नोटीस घेणार ची सांठ गांठ आहे, ते जाल साजी चे दाव पेज मांडता, थानेदार ची छबी यास मैली केली असता, त्यांचे प्रयत्न असफल झाले आहे.

२. जाहीर खुलासा घेणार यास माननीय डी. एस. पी. साहेब चे कनिष्ठ अपर डी. एस. पी. साहेब अकोला यास, आदेश माहिती अधिकार चे अंतर्गत दिले होते कि जाहीर खुलासा देणार यास सर्व कागद पत्र देण्यात यावा, जाहीर खुलासा घेणार यांनी त्या वेळी जाहीर खुलासा देणार वर गुन्हा दाखल करणे ची परवानगी मागितली परंतु मा. अपर डी. एस. पी. साहेब अकोला यांनी जाहीर खुलासा घेणार यास गुन्हा दाखल करणे ची परवानगी दिली नाही, आणि पुन्हा आदेश दिले कि जाहीर खुलासा देणार यास सर्व कागद पत्र द्यावा. परन्तु जाहीर खुलासा घेणार यांनी विद्यमान अपर डी. एस. पी. साहेब अकोला चे आदेश मान्य न करता उशीराने फक्त रमेश सुरेश गायकवाड चे एक अर्ज दि. ८-७-२०२६ रोजी दिले असता, सर्व माहिती प्रमाणे सर्व कागद पत्र दिले नाही. त्या वर एक तक्रार दि. ९-७-२०२६ रोजी जाहीर खुलासा देणार यांनी काही कागद पत्रा सोबत अर्ज क्रमांक १९८/०२५ ठेवले असता, न्याय निर्णय विषय असता, खुलासा घेणार यास काहीच, कोणता ही अधिकार नसता, त्यांचे पदाचा दुरुपयोग, करित असता, त्यांचे दुराचरण दिसुन येते.

३. रमेश सुरेश गायकवाड यांनी वरील मन्दिर चा उत्तर मार्ग गल्लीतील द्वार बंद केला आहे, व भोलेश्वर मार्ग ची सरकारी सडके वर गैर कायदेशीर बांध काम १००० स्के. फुट चे केले असता जाहीर खुलासा देणार यांनी अनेक रिपोर्ट सिटी कोतवाली अकोला मध्ये व महानगर पालिका आयुक्त अकोला कडे अर्ज ही दिला आहे, परंतु चौकशी नसता, २०२० साला पासुन अर्जा वर अर्ज आहे, अनेक अर्ज आहे.

अकोला
दि. ०७/०८/२०२६

सही
महंत रामकिशोरदास
गुरू जयरामदासजी


# शिष्यवृत्ती परीक्षेत सेंट पॉल्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे घवघवीत यश

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अकोट :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे यांच्या वतीने घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परीक्षेत सेंट पॉल्स अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5 वी) मध्ये शाळेची विद्यार्थिनी कृतिका गोपाल इंगळे हिने मेरिट यादीत स्थान मिळवत यश संपादन केले. या परीक्षेसाठी शाळेतील 50 विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी 16 विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

तसेच पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 8 वी)



मध्ये वेदांत राहुल दामदर व गार्गी प्रमोद राऊत यांनी मेरिटसह उत्तीर्ण होत विशेष यश मिळविले. या परीक्षेत शाळेतील एकूण 40 विद्यार्थी सहभागी झाले होते. त्यापैकी 13 विद्यार्थी पात्र ठरले आहेत.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे शाळेचे मुख्याध्यापक विजयजी बिहाडे, उपमुख्याध्यापिका ममता श्रावगी, तसेच रिंकू अग्रवाल, नितीन गावंडे, मालती महल्ले, वैशाली गावत्रे, सुचिता गायकवाड आणि सर्व शिक्षकांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थाध्यक्ष नवनीतजी लखोटिया, उपाध्यक्ष लूनकरणजी डागा, सचिव प्रमोदजी चांडक, रेखा चांडक, शारदा लखोटिया, सुधा डागा, दीपम लखोटिया व अवनी लखोटिया यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य हवे

**अकोला :** पर्यावरण संरक्षणाला प्राधान्य दिले जावे अशी मागणी पर्यावरण प्रेमी करीत आहेत. उन्हाळ्यातील तीव्र उष्णतामान कमी होण्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे अशी भावना व्यक्त केली जात आहे. सभोवतालचे नैसर्गिक आवरण, हवा, पाणी आणि वनांचे रक्षण करणे होय. यामध्ये अधिक झाडे लावणे, पाणी व ऊर्जेची बचत करणे आणि कचरा कमी करणे या मुख्य उपायांचा समावेश होतो. संरक्षणासाठी अधिक रोपे लावणे आणि वृक्षतोड थांबवणे, पाणी आणि विजेचा कमी व योग्य वापर करणे, प्लास्टिकचा वापर टाळणे आणि वस्तूंचा पुनर्वापर करणे, गाडीऐवजी चालत जाणे, पर्यावरण सुरक्षा म्हणजे आपल्या सभोवतालच्या नैसर्गिक आवरणाला संरक्षण देणे आणि ते जीवनासाठी अनुकूल ठेवणे.

## हिवरखेड पाणीपुरवठा योजना प्रगतीपथावर



प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**हिवरखेड :** पाणी पुरवठा योजनेचे कार्य प्रगतीपथावर असून यामध्ये नगरपरिषदच्या वतीने मोठे लाईट लावण्यात आले तर मोठ्या प्रमाणात येथील भिंतीची रंगोटी, फ्लोअरिंग यासह विविध कामे करण्यात येत आहेत. तसेच स्वच्छ पाणीपुरवठा नागरिकांना मिळावा याकरिता दोन दिवस पानी पुरवठा बंद ठेवून पाणी फिल्टर व जलशुद्धीकारणाची धुणी करून स्वच्छता करण्यात आली व पुन्हा पाणी पुरवठा सुरळीत करण्यात आला,योग्य प्रमाणात आलम व बिलिचिंग पावडरचा साठा सुद्धा उपलब्ध करण्यात आला यावेळी नगरपरिषदच्या नगराध्यक्षा सौ सुलभा दुतोंडे यांच्या नेतृत्वाखाली पाणीपुरवठा सभापती अजीज खा, संदीप इंगळे, पाणीपुरवठा कर्मचारी गणेश भारसाकळे , काजिमोद्दीन, अंकुश शिंदपुरे, निखिल ओंकारे, बेलूरकार यांनी या दरम्यान पाहणी करून येथील जलशुद्धीकरणाचे नीट नेटके कार्य पार पाडण्याचा प्रयत्न केला.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# महिलेच्या खूनप्रकरणी आरोपीला जन्मठेप

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**यवतमाळ :** बाभुळगाव तालुक्यातील पिंप्री इजारा येथे २०१७ मध्ये झालेल्या महिलेच्या खूनप्रकरणी जिल्हा व सत्र न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. वैद्यकीय पुरावे, साक्षीदारांच्या जबाबांवर विश्वास ठेवत न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. तसेच ३० हजार रुपयांचा दंड आणि पीडितेच्या दोन मुलांना नुकसानभरपाई देण्याचेही आदेश दिले.

किशोर दामोदर गर्वाले (वय ४६, रा. पिंप्री इजारा, ता. बाभुळगाव) असे शिक्षा ठोठावलेल्या आरोपीचे नाव आहे. सदर आरोपीने दिनांक २ जानेवारी २०१७ रोजी गावाबाहेरील रस्त्यावर रूपाली संदीप भगत यांच्यावर विळ्याने हल्ला केला होता. घरात बाहेरगावचे लोक येत असल्याच्या संशयातून झालेल्या वादातून हा हल्ला झाल्याचे तपासात समोर आले. गंभीर जखमी झालेल्या रूपाली भगत यांच्यावर बाभुळगाव, यवतमाळ आणि नंतर सेवाग्राम येथे उपचार करण्यात आले. मात्र, २४ मे २०१७ रोजी उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

सुरुवातीला बाभुळगाव पोलिसांनी भारतीय दंड संहितेच्या कलम ३२४ अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर गुन्ह्यात कलम ३०७ आणि पीडितेच्या मृत्यूनंतर कलम ३०२ ची भर घालण्यात आली. तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक सोपान व्ही. पाटोले यांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

खटल्यादरम्यान अभियोजन पक्षाने १२ साक्षीदार तपासले. वैद्यकीय अधिकारी आणि इतर साक्षीदारांच्या जबाबांसह वैद्यकीय पुरावे निर्णायक ठरले. त्यावरून जिल्हा व सत्र न्यायाधीश क्र. १ एस. यू. बघेले यांनी आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३०२ अंतर्गत दोषी ठरवत जन्मठेपेची शिक्षा सुनावली. आरोपीला ३० हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला असून, दंड न भरल्यास दोन वर्षांचा अतिरिक्त कारावास भोगावा लागणार आहे. तसेच पीडितेच्या दोन्ही मुलांना एकूण ३० हजार रुपयांची नुकसानभरपाई देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.

या प्रकरणात अतिरिक्त सरकारी अभियोक्ता चंद्रशेखर रा. डाहे यांनी सरकार पक्षाची बाजू प्रभावीपणे मांडली. तर पैरवी अधिकारी जमादार संजय कासार यांनी न्यायालयीन कामकाजात सहकार्य केले.

# वाघिणीला अखेर 'जॉन'ची साथ



## पैनगंगेतील व्याघ्रसंवर्धन प्रयोगाला यशाची चाहूल

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**उमरखेड :** पैनगंगा अभयारण्यात वाघांची संख्या वाढविण्यासाठी वनविभागाने राबविलेला महत्त्वाकांक्षी व्याघ्रसंवर्धन प्रयोग निर्णायक टप्प्यावर पोहोचला आहे. पेंच व्याघ्र प्रकल्पातून स्थलांतरित करण्यात आलेल्या वाघिणीने अभयारण्यातील 'जॉन' या नर वाघाशी नैसर्गिक सहवास स्वीकारल्याचे वनविभागाच्या निरीक्षणातून स्पष्ट झाले आहे. या घडामोडीमुळे पैनगंगा अभयारण्यात प्रथमच नियोजनबद्ध व्याघ्रसंवर्धन मोहिमेला यश मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

अभयारण्यात वाघांची संख्या मर्यादित असल्याने काही महिन्यांपूर्वी पेंच व्याघ्र प्रकल्पातून एका प्रौढ वाघिणीचे स्थलांतर करण्यात आले होते. प्रारंभी तिचे 'जॉनी' या नर वाघाशी मिलन घडवून आणण्याचे नियोजन होते. मात्र, जॉनीचा माग काढता न आल्याने संपूर्ण मोहिमेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

दरम्यान, वनविभागाने हार न मानता अभयारण्यातील 'जॉन' या नर वाघाच्या हालचालींवर बारकाईने लक्ष ठेवले. कॅमेरा ट्रॅप, पगमार्क आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या सातत्यपूर्ण निरीक्षणातून जॉन आणि स्थलांतरित वाघीण एकत्र वावरत असल्याचे पुरावे समोर आले. सध्या ही जोडी एकंबा परिसरातील जंगलात स्थिरावली असून, दोघांमध्ये नैसर्गिक सुसंवाद निर्माण झाल्याचे वनअधिकाऱ्यांचे निरीक्षण आहे.

वन्यजीव तज्ज्ञांच्या मते, स्थलांतरित वाघिणीने नवीन अधिवास स्वीकारणे आणि स्थानिक नर वाघाशी जोडी निर्माण होणे हा संवर्धनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो. आगामी काळात या जोडीपासून बछड्यांचा जन्म झाल्यास पैनगंगा अभयारण्यातील व्याघ्रसंख्या नैसर्गिकरीत्या वाढण्यास मोठी मदत होईल.

या पार्श्वभूमीवर वनविभागाने एकंबा परिसरात गस्त, कॅमेरा ट्रॅपचे जाळे आणि मानवी हस्तक्षेप रोखण्यासाठी विशेष उपाययोजना अधिक कडक केल्या आहेत. व्याघ्रसंवर्धनाचा हा प्रयोग यशस्वी ठरल्यास पैनगंगा अभयारण्य विदर्भातील महत्त्वाच्या व्याघ्र अधिवासांपैकी एक म्हणून अधिक सक्षमपणे उदयास येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# MMC नोंदणीविरोधात IMAचा एल्गार; उमरखेडमध्ये मोर्चा

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**उमरखेड :** सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल (MMC) मध्ये नोंदणी देऊन आधुनिक वैद्यकीय उपचार करण्यास परवानगी देण्याच्या राज्य शासनाच्या निर्णयाविरोधात इंडियन मेडिकल असोसिएशन (IMA) उमरखेड शाखेने गुरुवारी तीव्र आंदोलन छेडले. शहरातून निषेध मोर्चा काढत उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडक देण्यात आली. शासनाने हा निर्णय तातडीने मागे घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला.

महात्मा गांधी चौकातून सकाळी १० वाजता मोर्चाला सुरुवात झाली. विविध मार्गांवरून मार्गक्रमण करत डॉक्टरांनी उपविभागीय अधिकारी कार्यालय गाठले आणि शासनाच्या नावाने निवेदन सादर केले.

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर ६ ऑगस्टपासून बाह्यरुग्ण सेवा (ओपीडी), आंतररुग्ण सेवा (आयपीडी) आणि नियमित वैद्यकीय सेवा बेमुदत बंद ठेवण्यात आल्याचे जाहीर करण्यात आले.

IMAच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, आधुनिक वैद्यकीय शिक्षणासाठी एमबीबीएस अभ्यासक्रमात दीर्घकालीन सैद्धांतिक शिक्षण, क्लिनिकल प्रशिक्षण, इंटर्नशिप आणि प्रत्यक्ष रुग्णसेवा अनिवार्य असते.

अशा परिस्थितीत अल्पकालीन सीसीएमपी अभ्यासक्रमाच्या आधारे आधुनिक वैद्यकीय उपचार करण्यास परवानगी देणे रुग्णांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने धोकादायक ठरू शकते. चुकीचे निदान, उपचारातील त्रुटी आणि वैद्यकीय गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीतीही त्यांनी व्यक्त केली.

संघटनेने स्पष्ट केले की, कोणत्याही वैद्यकीय शाखेला विरोध नसून प्रत्येक वैद्यकीय पद्धतीचा आदर आहे. मात्र संबंधित शाखेचे शिक्षण, प्रशिक्षण आणि कायदेशीर पात्रता यानुसारच वैद्यकीय व्यवसाय करण्याची व्यवस्था कायम राहिली पाहिजे, अशी संघटनेची भूमिका आहे.

आंदोलनात IMAच्या अध्यक्षा डॉ. सारिका देशमुख, सचिव डॉ. विवेक पत्रे, डॉ. मंगेश नरवाडे, डॉ. या. मा. राऊत, डॉ. गजानन, डॉ. संदेश देशमुख, डॉ. सोनाली बंग, डॉ. प्रीती जयस्वाल, डॉ. श्रीकांत जयस्वाल, डॉ. कुणाल काळे, डॉ. किशोर राठोड, डॉ. राम नाईक, डॉ. प्रफुल भानेगावकर, डॉ. अर्चना रावते, डॉ. जयराम बसी, डॉ. सारिका वानखेडे, डॉ. नोहेद गौस, डॉ. अरुण बंग, डॉ. सुनील बंग, डॉ. कृष्णा नाईक, डॉ. नागेश माने यांच्यासह मोठ्या संख्येने डॉक्टर सहभागी झाले.

# डेंग्यू रोखण्यासाठी वस्तीसेविकांना प्रशिक्षण

## यवतमाळ नगर परिषद व जिल्हा हिवताप विभागाची संयुक्त कार्यशाळा

प्रतिनिधी ७ ऑगस्ट




**यवतमाळ :** शहरात डेंग्यूसह किटकजन्य आजारांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी यवतमाळ नगर परिषद आणि जिल्हा हिवताप विभागाच्या संयुक्त विद्यमाने नगर भवन येथे दीनदयाळ अंत्योदय योजनेतील वस्तीसेविका व समूह संसाधन व्यक्तींसाठी डेंग्यू सर्वेक्षण प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आली.

मागील दोन वर्षांत वस्तीसेविकांनी केलेल्या सर्वेक्षण व जनजागृतीमुळे डेंग्यू नियंत्रणात ठेवण्यात यश आल्याने हे अभियान अधिक प्रभावी करण्यासाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. शहरातील प्रत्येक भागात डेंग्यू प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्याच्या सूचना यावेळी देण्यात आल्या.

कार्यशाळेच्या अध्यक्षस्थानी नगराध्यक्षा ॲड. प्रियदर्शिनी उईके होत्या. आरोग्य सभापती लताताई ठोंबरे, मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, उपमुख्याधिकारी राकेश भोयर उपस्थित होते. जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. तनवीर शेख यांनी पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे डेंग्यूची लक्षणे, डासांची उत्पत्ती रोखण्याचे उपाय, घराघरांत सर्वेक्षणाची पद्धत आणि जनजागृतीबाबत मार्गदर्शन केले. प्रास्ताविक सहाय्यक जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. रश्मी शेंगर यांनी केले.

कार्यक्रमाचे संचालन शहर अभियान व्यवस्थापक दर्शन श्रीवास्तव यांनी, तर आभार प्रदर्शन शहर अभियान व्यवस्थापक अनिल जिरापुरे यांनी केले. कार्यशाळेला शिक्षण विभागाचे प्रशासन अधिकारी डॉ. विनोद डवले, नगर परिषदेच्या शाळांचे मुख्याध्यापक, महिला बचत गटांच्या सदस्यांसह मोठ्या संख्येने वस्तीसेविका आणि प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

# टिईटी अर्हतेच्या मुद्द्यावर शिक्षक समिती आक्रमक; पदोन्नती प्रक्रिया स्थगित करण्याची मागणी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**यवतमाळ :** जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेत टिईटी अर्हतेची अंमलबजावणी करताना अनेक ज्येष्ठ शिक्षकांवर अन्याय होत असल्याचा दावा करत महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीच्या यवतमाळ जिल्हा शाखेने पदोन्नती प्रक्रिया तात्पुरती स्थगित करण्याची मागणी केली आहे. याबाबतचे सविस्तर निवेदन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांना सादर करण्यात आले.

समितीने निवेदनात म्हटले आहे की, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या २९ जुलै २०२६ च्या शासन निर्णयानुसार पदोन्नतीसाठी टिईटी अर्हतेची अंमलबजावणी करण्यात येत आहे. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या आदेशानुसार शिक्षकांना ३१ ऑगस्ट २०२८ पर्यंत टिईटी उत्तीर्ण होण्यासाठी मुदत दिली आहे. त्यामुळे या मुदतीचा विचार करून प्रचलित नियमांनुसार पदोन्नती देण्यात यावी, अशी समितीची भूमिका आहे. जून २०२६ मध्ये होणे अपेक्षित असलेली MAH-TET परीक्षा वेळेत न झाल्यामुळे हजारो शिक्षकांना TET उत्तीर्ण होण्याची संधी मिळाली नाही. यासाठी शिक्षक जबाबदार नसताना त्याचा परिणाम त्यांच्या पदोन्नतीवर होणे अन्यायकारक असल्याचे समितीने नमूद केले आहे. याशिवाय, ६ सप्टेंबर २०२६ रोजी होणाऱ्या C-TET परीक्षेसाठी जिल्ह्यातील अनेक शिक्षकांनी अर्ज केले आहेत. या परीक्षेचा निकाल लागण्यापूर्वी पदोन्नती प्रक्रिया पूर्ण झाल्यास अनेक पात्र शिक्षक संधीपासून वंचित राहतील. त्यामुळे C-TET चा निकाल जाहीर होईपर्यंत पदोन्नती प्रक्रिया स्थगित ठेवावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, नागपूर खंडपीठाने ४ ऑगस्ट २०२६ रोजी दिलेल्या स्थगनादेशाचा सन्मान राखून न्यायालयीन प्रक्रियेच्या अधीन राहूनच निर्णय घेण्याची विनंतीही समितीने केली आहे. निवेदन देताना जिल्हा नेते पुंडलिक रेकलवार, जिल्हाध्यक्ष मुकेश भोयर, राज्य प्रमुख (जुनी पेन्शन) प्रफुल्ल पुंडकर, जिल्हा सरचिटणीस संजय काळे, पतसंस्था अध्यक्ष महेश सोनेकर, राज्य कार्यकारिणी सदस्य संदीप मोहाडे, जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर मोरझडे, जिल्हा कोषाध्यक्ष संदीप टूले यांच्यासह अमोल माळे, महेश काळे, अमर गुजर, सदानंद सूर्यवंशी, आशन्ना गुंडावार, विनोद क्षीरसागर, संजय राऊत, सुभाष पारधी, विजय लांडे, समीर डाखोळे, भुमन्ना कसरेवार, विनोद गवळी, उमेश डेहनकर आणि रविंद्र नंदूरकर उपस्थित होते.

# अवैध रेती-मुरूम उत्खननावर कारवाईचा बडगा

## रॉयल्टीच्या दहापट दंडाची अंमलबजावणी; पैनगंगा नदीपात्रावर विशेष नजर

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**उमरखेड :** पैनगंगा नदीपात्रातील अवैध रेती उपसा आणि तालुक्यातील मुरूम उत्खननाला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाने कठोर पावले उचलली आहेत. शासनाच्या नव्या धोरणानुसार आता अवैध उत्खनन अथवा खनिज वाहतूक करताना आढळणाऱ्यांकडून थेट रॉयल्टीच्या दहापट दंडाची वसुली केली जाणार आहे. त्यामुळे वर्षानुवर्षे बिनधास्तपणे सुरू असलेल्या अवैध खनिज व्यवसायावर मोठा आर्थिक आघात होणार असल्याचे मानले जात आहे.

उमरखेड तालुक्यातील पैनगंगा नदीपात्रातून रात्रीच्या वेळी मोठ्या प्रमाणावर वाळूचा उपसा होत असल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील टेकड्यांमधूनही मुरूमाचे बेकायदेशीर उत्खनन सुरू असल्याने शासनाचा महसूल बुडत होता आणि पर्यावरणाची हानी होत होती. यापूर्वी तीन ते पाचपट दंडाची तरतूद असल्याने संबंधितांकडून दंड भरून पुन्हा त्याच व्यवसायात उतरल्याची उदाहरणेही समोर आली होती. मात्र, आता दहापट दंडाच्या नव्या तरतुदीमुळे अशा प्रकारांना प्रभावी आळा बसेल, असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.

महसूल विभागाने संशयित उत्खनन स्थळांवर विशेष पथके तैनात करण्याचा निर्णय घेतला असून, उमरखेड, ढाणकी आणि विदर्भ-मराठवाडा सीमेवरील पैनगंगा घाटांवर गस्त वाढविण्यात येणार आहे. अवैध वाहतूक करणारे ट्रॅक्टर, हायवा, पोकलेनसह इतर यंत्रसामग्री जप्त करून कायद्यानुसार कारवाई केली जाणार आहे.

> "अवैध उत्खनन आणि खनिज वाहतुकीबाबत शून्य सहनशीलतेचे धोरण स्वीकारण्यात आले आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांकडून रॉयल्टीच्या दहापट दंडाची वसुली केली जाईल. आवश्यकतेनुसार गुन्हे दाखल करून संबंधित वाहने जप्त करण्याची कारवाईही केली जाईल."
> - आर. यू. सुरडकर, तहसीलदार, उमरखेड


### पाणीटंचाईवरही होऊ शकतो परिणाम

नदीपात्रातील बेसुमार वाळू उपशामुळे भूजल पातळी खालावल्याचा परिणाम अनेक गावांमध्ये उन्हाळ्यात तीव्र पाणीटंचाईच्या स्वरूपात दिसून येत आहे. नदीतील वाळू पाणीसाठा टिकवून ठेवण्यास महत्त्वाची भूमिका बजावत असल्याने अवैध उत्खननावर नियंत्रण आल्यास जलस्रोतांचे संवर्धन आणि भूजल पुनर्भरणाला मदत होईल, अशी अपेक्षा पर्यावरण अभ्यासक व्यक्त करीत आहेत.

# पालकमंत्र्यांच्या हस्तक्षेपाने 'सावित्रीच्या लेकी' आश्रयालयाला दिलासा

## अतिक्रमण कारवाईला तात्पुरती स्थगिती; ७० मुलींच्या शिक्षणाला दिला आधार

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**यवतमाळ :** वाघाडी परिसरातील पारधी समाजातील मुलींसाठी कार्यरत असलेल्या 'आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी' आश्रयालयावरील प्रस्तावित अतिक्रमण हटाव कारवाईला अखेर तात्पुरती स्थगिती मिळाली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्या हस्तक्षेपानंतर प्रशासनाने कारवाई थांबविण्याचा निर्णय घेतला. तसेच आश्रयालयाची जागा शासनाच्या नियमांनुसार नियमित करता येईल का, याची कायदेशीर पडताळणी करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आले.

गुरुवारी पालकमंत्री राठोड यांनी आश्रयालयाच्या संस्थापक पपिता माळवे व इसू माळवे यांना जिल्हाधिकारी कार्यालयात बोलावून संपूर्ण परिस्थिती जाणून घेतली. त्यानंतर जिल्हाधिकारी विकास मीना आणि यवतमाळ नगर परिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार यांच्याशी चर्चा करून आश्रयालयाच्या जागेबाबत नियमांच्या चौकटीत मार्ग काढण्याच्या शक्यता तपासण्याचे निर्देश दिले.

यापूर्वी आश्रयालयाच्या अध्यक्ष पपिता माळवे, इसू माळवे आणि युवासेना जिल्हाप्रमुख प्रद्युम्न जवळेकर यांनी पालकमंत्र्यांची भेट घेऊन अतिक्रमण कारवाईमुळे पारधी समाजातील सुमारे ७० मुलींच्या शिक्षणावर संकट ओढवल्याची बाब निदर्शनास आणून दिली होती. त्यानंतर पालकमंत्र्यांनी तातडीने प्रशासनाशी चर्चा करून हस्तक्षेप केला. बैठकीत सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थांच्या अडचणी सोडविण्यासाठी प्रशासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशा सूचना पालकमंत्री राठोड यांनी दिल्या. समाजोपयोगी कार्य करणाऱ्या संस्थांच्या पाठीशी शासन आणि प्रशासन कायम उभे राहील, अशी ग्वाहीही त्यांनी दिली.

या निर्णयाचे युवासेनेने स्वागत केले असून, आश्रयालयाला कायमस्वरूपी कायदेशीर संरक्षण मिळावे आणि वंचित मुलींचे शिक्षण अखंड सुरू राहावे, यासाठी पुढेही पाठपुरावा सुरू ठेवण्याची भूमिका व्यक्त केली. बैठकीला रमेश केळकर, प्रा. हजारे यांच्यासह युवासेनेचे पदाधिकारी उपस्थित होते.

### 'सावित्रीच्या लेकींचे शिक्षण खंडित होऊ देणार नाही'

"आम्ही साऱ्या सावित्रीच्या लेकी" आश्रयालयातील वंचित, निराधार आणि पारधी समाजातील मुलींचे शिक्षण कोणत्याही परिस्थितीत थांबू देणार नाही. समाजातील दुर्बल घटकांपर्यंत शिक्षणाची संधी पोहोचविणे ही शासनाची आणि समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रशासनाने कायदेशीर चौकटीत सकारात्मक निर्णय घेऊन या मुलींचे भविष्य सुरक्षित करावे, असे पालकमंत्री संजय राठोड यांनी सांगितले.

# कचरा डेपो हटवा; मनसेचा प्रशासनाला १५ दिवसांचा अल्टिमेटम

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**आर्णी :** दिग्रस रोडलगत असलेल्या कचरा डेपोमुळे शहरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनल्याचा आरोप करत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) आक्रमक भूमिका घेतली आहे. दुर्गंधी, धूर आणि डासांच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले असून, हा डेपो तातडीने अन्यत्र स्थलांतरित करावा, अशी मागणी मनसेने नगरपरिषद प्रशासनाकडे केली आहे.

मनसेने दिलेल्या निवेदनानुसार, शहराचा कचरा डेपो नागरी वस्तीच्या अगदी लगत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरत आहे. यामुळे डासांचे प्रमाण वाढून संसर्गजन्य आजारांचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे, डेपोजवळच शासकीय वस्तीगृह सुरू होणार असल्याने तेथे राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आरोग्यावरही विपरीत परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात आली आहे.

कचऱ्याला वारंवार आग लावली जात असल्याने निर्माण होणारा धूर शहरात पसरून नागरिकांना श्वसनाच्या त्रासाला सामोरे जावे लागत असल्याचा आरोपही मनसेने केला आहे. या गंभीर प्रश्नाकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याची टीका संघटनेने केली. मनसेने प्रशासनाला १५ दिवसांची मुदत देत कचरा डेपोचे स्थलांतर करण्याची मागणी केली आहे. निर्धारित कालावधीत निर्णय न झाल्यास तीव्र स्वरूपाचे 'बोंबाबोंब आंदोलन' छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. आंदोलनामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची जबाबदारी प्रशासन आणि नगराध्यक्षांची राहील, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी मनसेचे उपजिल्हाध्यक्ष सचिन यलगंधेवार, आकाश माटलवाड, कपिल ठाकरे, सतीश संब्रवार यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी उपस्थित होते.

सिटी न्यूज सुपरफास्ट अमरावती

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper.citynewssuperfast.com



## 10 ऑगस्ट रोजी विभागीय महिला लोकशाही दिन

अमरावती: महिला व बालविकास विभागाच्या 4 मार्च 2013 च्या शासन निर्णयानुसार समस्याग्रस्त पिडीत महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्याकरिता व्यासपीठ मिळावे तसेच त्यांच्या हक्कांचे संरक्षण होवून न्याय मिळावा याद्दष्टीने महिलांच्या तक्रारी/अडचणी शासकीय यंत्रणेकडून सोडवून समाजातील समस्यासग्रस्त, पिडीत महिलांना सुलभ मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध व्हावी, यासाठी एक प्रभावी उपाययोजना म्हणून महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते.

# सायबर गुन्हेगारांना मदत करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा पर्दाफाश

## देशातील विविध 20 राज्यांतील सायबर फसवणुकीची रक्कम जमा झाल्याचे निष्पन्न

**अमरावती :** सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहर यांनी Mule Account Hotspot चे तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे केलेल्या तपासात बँक ऑफ इंडिया, अमरावती येथील एका बँक खात्यामध्ये देशातील विविध 20 राज्यांतील सायबर फसवणुकीची रक्कम जमा झाल्याचे निष्पन्न झाले होते. सदर खात्याची KYC कागदपत्रे, खाते व्यवहार व इतर माहितीची पडताळणी केल्यानंतर हे खाते आरोपी शेख अमीन शेख लतीफ यांच्या नावावर असल्याचे स्पष्ट झाले होते. तांत्रीक तपासात सायबर फसवणुकीतून प्राप्त झालेली रक्कम या खात्यात जमा करून ती पुढे विविध बँक खात्यांमध्ये व इतर माध्यमांतून हस्तांतरित करण्यात येत असल्याचे निष्पन्न झाले. प्राथमिक तपासात सदर खाते सायबर फसवणूक, ऑनलाइन गेमिंग व क्रिप्टोकरन्सी व्यवहारांसाठी Mule Account म्हणून वापरण्यात आल्याचे निष्पन्न झाले असून सदर खात्यावर सुमारे ₹71,00,000/- (अक्षरी एकाहत्तर लाखांचे) आर्थिक व्यवहार झाल्याचे दिसुन आले.

याप्रकरणी पोलीस स्टेशन सायबर, अमरावती शहर येथे अप. क्र. 25/2026 अन्वये कलम 318(4), 112(2), 3(5), 61(2) भारतीय न्याय संहिता (BNS) तसेच कलम 66 (D) माहिती तंत्रज्ञान अधिनियम (IT Act) अंतर्गत गुन्हा दाखल करून तपास सुरू करण्यात आला. तांत्रिक विश्लेषणाद्वारे आरोपी शेख अमीन शेख लतीफ याने सदर बँक खाते पैशाच्या मोबदल्यात रवी विश्वनाथ गडलिंग, रा. राहुल नगर, बिच्छू टेकडी, अमरावती यास उपलब्ध करून दिल्याचे निष्पन्न झाले. पुढील तपासात रवी गडलिंग याने हे खाते आकाश दीपक जयसिंघानी, रा. पोद्दार बगीचा, रामनगर, जि. वर्धा यास दिल्याचे समोर आले.




वरिष्ठांच्या परवानगीने पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या मार्गदर्शनात सपोनि अनिकेत कासार, पो.कॉ. निखिल हिमाने, पो.कॉ. रोशन लकडे व पो. कॉ. अनिकेत वानखडे यांच्या तपास पथकाने वर्धा येथे कारवाई करून मुख्य आरोपी आकाश दीपक जयसिंघानी यास ताब्यात घेतले. त्याच्याकडून 4 सिमकार्ड, विविध बँक खात्यांच्या तपशीलाच्या कागदपत्रांच्या चिठ्ठ्या तसेच 2 मोबाईल हँडसेट असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

या प्रकरणात शेख अमीन शेख लतीफ, रवी विश्वनाथ गडलिंग व आकाश दीपक जयसिंघानी या तिन्ही आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांची पोलीस कोठडी मिळविण्यात आली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू असून या रॅकेटमधील इतर सहभागी आरोपींचा शोध घेण्यात येत आहे.

ही उल्लेखनीय कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त (मुख्यालय), प्रांजली सोनावणे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे यांच्या नेतृत्वात सपोनि अनिकेत कासार, पो.हे. कॉ. जितेंद्र थोरात, पो.हे.कॉ. निखिल माहुरे, पो.हे. कॉ. उल्हास टवलारे, पो.हे.कॉ. नरेंद्र उघडे, पो.कॉ. निखिल हिमाने, पो.कॉ. अश्विन यादव, पो.कॉ. रोशन लकडे, पो.कॉ. करण बोरकुटे, पो.कॉ. निलेश वानखडे, पो.कॉ. बाळू पालवे, पो.कॉ. अनिकेत वानखडे, पो.कॉ. पवन जाधव, राहुल चारथळ व पो. कॉ. अविनाश पोकळे यांनी पार पाडली.

### नागरिकांना आवाहन

कमिशन किंवा कोणत्याही आमिषाला बळी पडून आपले बँक खाते (Mule Account), ATM कार्ड, UPI किंवा बैंकिंग माहिती कोणालाही देऊ नका. अशा प्रकारे खाते उपलब्ध करून देणे हा कायद्याने गुन्हा आहे. बँक खाते उघडून देणारे किंवा Mule Account साठी एजंट म्हणून काम करणाऱ्या व्यक्तींची माहिती तात्काळ सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहर येथे द्या. कोणतीही सायबर फसवणूक झाल्यास 1930 वर संपर्क साधा किंवा www.cybercrime.gov.in वर तक्रार नोंदवा.

# जिल्ह्यातील सर्व खाजगी आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करावी

## कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पाऊल

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अमरावती:** जिल्ह्यातील ज्या खाजगी कार्यालयांमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक महिला कर्मचारी असतील अशा आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करावी तसेच सीबॉक्स पोर्टलवर त्याची नोंदणी करण्यात यावी असे आवाहन, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संजय गट यांनी केले आहे. ज्या शासकीय व निमशासकीय कार्यालयांनी अशी समिती स्थापन केली नाही व पोर्टलवर नोंद केली नाही त्यांनी तातडीने हे कार्य पार पाडण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

महिला व बाल विकास आयुक्तालयाने कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध ,मनाई आणि निवारण) अधिनियम २०१३ (पॉश कायदा) ची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी या कायद्याच्या कलम -४ अन्वये ज्या खाजगी कार्यालयांमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक महिला कर्मचारी असतील अशा आस्थापनांनी अंतर्गत तक्रार समिती स्थापन करून आस्थापनेतील अंतर्गत तक्रार समितीची नोंदणी सीबॉक्स पोर्टलवर (https://shebox.wcd.gov.in ) करण्याचे निर्देश दिले आहेत. यानुसार जिल्हयातील सर्व खाजगी आस्थापनांनी अशा समिती स्थापन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. पॉश कायद्याच्या अंमलबजावणीसाठी शासकीय,निमशासकीय व खाजगी आस्थापनांमध्ये अंतर्गत तक्रार समिती स्थापन करणे व त्याची नोंद सीबॉक्स पोर्टलवर करणे बंधनकारक असून सीबॉक्स पोर्टलवर नोंदणी करणे गरजेचे आहे. ज्या आस्थापनांनी अद्यापपर्यंत ही कार्यवाही केली नाही.

# हर घर तिरंगा' अभियानात उत्स्फूर्तपणे सहभागी व्हा : अपर आयुक्त संजय जाधव

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अमरावती :** भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी वाटचाली निमित्त देशभरात दि. 9 ते 17 ऑगस्ट या कालावधीत 'हर घर तिरंगा' अभियान राबविण्यात येणार आहे. आपल्या देशाच्या एकात्मतेचे आणि अस्मितेचे प्रतीक असलेला राष्ट्रध्वज प्रत्येक शासकीय कार्यालयांवर फडकावून या राष्ट्रीय उत्सवात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन अपर आयुक्त संजय जाधव यांनी आज येथे केले.

विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत श्री. जाधव यांनी हर घर तिरंगा मोहिमेच्या अनुषंगाने दूरदृश्यप्रणालीच्या माध्यमातून विभागाचा आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग, शिक्षण, महिला व बालविकास, मनपा प्रशासन आदी विभागाचे विभागप्रमुख यावेळी उपस्थित होते.

शासनाच्या सूचनेनुसार महापालिका आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने या अभियानाची व्यापक तयारी करण्यात येत आहे. शहरात महाराष्ट्र राज्य खादी ग्रामोद्योग मंडळाच्या केंद्रात तसेच इतर ठिकाणी राष्ट्रध्वज उपलब्ध करून देण्यासाठी विक्री आणि वितरण केंद्र उभारण्यात आली आहेत. तसेच, नागरिकांमध्ये या उपक्रमाबाबत जनजागृती करण्यासाठी शिक्षण, महिला व बालविकास तसेच आरोग्य विभागाव्दारे विविध सांस्कृतिक कार्यक्रम, रॅली आणि उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, असे त्यांनी यावेळी सांगितले. स्वातंत्र्याचा हा सोहळा केवळ एक शासकीय उपक्रम नसून, प्रत्येक भारतीयाच्या असीम देशप्रेमाची ती एक अभिव्यक्ती आहे.

'हर घर तिरंगा' मोहिमेमुळे आपल्या मनात राष्ट्रप्रेमाची भावना अधिक दृढ होते. विभागातील प्रत्येक शासकीय कार्यालयाच्या इमारतींवर तिरंगा फडकवून या चळवळीत आपला सहभाग नोंदवावा, असे आवाहन श्री. जाधव यांनी यावेळी केले. राष्ट्रध्वजाचा आदर राखून शासकीय कार्यालयाच्या इमारतीवर राष्ट्रध्वज फडकवताना 'भारतीय ध्वज संहिते'चे तंतोतंत पालन केले जावे. ध्वज कुठेही फाटलेला किंवा मळलेला नसावा, तिरंगा उतरवताना त्याचा योग्य सन्मान राखला जावा आणि अभियान कालावधीनंतर ध्वज सुरक्षित ठिकाणी जतन करून ठेवावा.

### रक्षाबंधनानिमित्त रेल्वे डाक सेवा काउंटरवर रात्री उशिरापर्यंत बुकिंग सुविधा

अमरावती: रक्षाबंधन सणा निमित्ताने राखी,भेटवस्तू, पार्सल आणि इतर टपाल वस्तूंच्या बुकिंगसाठी नागरीकांच्या सोयीकरिता अमरावती रेल्वे स्थानकावरील रेल्वे डाक सेवा काउंटर दुपारी ४ ते रात्री १०.३० पर्यंत सुरु ठेवण्यात आल्याचे रेल्वे डाक सेवा नागपूरचे अधीक्षक गणेश अंभोरे यांनी कळविले आहे. ग्राहकांना रक्षाबंधन सणाच्या पार्श्वभूमीवर राखीचे पार्सल वेळेवर रवाना व वितरीत करता यावे म्हणून कार्यालयीन वेळेनंतरही रात्री उशिरापर्यंत रेल्वे डाक सेवा काउंटरवर बुकिंग सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या काउंटरवर ग्राहकांसाठी स्पीड पोस्ट, पार्सल सेवा, आंतरराष्ट्रीय टपाल व पार्सल सेवा उपलब्ध असणार आहेत.

# MIDC नांदगाव पेठ येथील हिंगने कंपनीतील चोरीचा गुन्हा यशस्वीपणे उघडकीस

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अमरावती :** MIDC नांदगाव पेठ येथील हिंगने कंपनीतील चोरीचा गुन्हा यशस्वीपणे उघडकीस केला आहे. पोलीस ठाणे नांदगाव पेठ हददीमध्ये MIDC येथील रजत अरूणपंत हिंगणे, यांच्या हिंगणे मसाला कंपनी मधील एकुण ४ इलेक्ट्रीक मोटार किंमत अंदाजे ५९,०००/-रू च्या इलेक्ट्रीक मोटार कोण्यातरी अज्ञात चोरटयांनी दिनांक २३.०७.२०२६ चे ५ वा ते दिनांक ३०.०७.२०२६ रोजी चे १०.३० या दरम्यान चोरून नेल्या. अश्या तक्रारी वरून पोलीस ठाणे नांदगाव पेठ येथे अप कं. ३०४/२०२६ कलम ३०५ (१),३३१ (३),३३१ (४) भा.न्या. स. दाखल प्रमाणे गुन्हा दाखल करून तपासात घेतला.




कोणताही तांत्रीक पुरावा तसेच सहाय नसताना गोपनीय माहीतीचे आधारे कौशल्य पुर्ण तपास करून दिनांक ४ ०८.२०२६ रोजी सदर गुन्हयातील आरोपी नामे क्रं. १ आशीष गोपाल रामटेके, वय ३५ वर्ष, व्यवसाय - सेक्युरीटी गॉर्ड, रा. ग्राम सावर्डी ता. जि. अमरावती, नितेश भिमराव गजभिये, वय २३ वर्ष, व्यवसाय सेक्युरीटी गॉर्ड, रा. चिंचोली गवळी ता. मोर्शी जि. अमरावती ह.मु. ग्राम सावर्डी ता. जि. अमरावती, मोहम्मद शकील मोहम्मद लाईक वय ३३ वर्ष, व्यवसाय भंगार विक्रेता, रा. यास्मीन नगर, झोपडपटटी अमरावती यांना निष्पन्न करून मोठया शिताफीने अटक करून त्यांचे कडुन गुन्हयातील एकुण ५९,०००/- रू चा मुददेमाल हस्तगत केला.

सदरची कामगिरी पोलीस आयुक्त राकेश ओला पोलीस उपायुक्त परीमंडळ १, यशवंत सोळंके, सहा. पोलीस आयुक्त नयन आलुरकर यांचे मार्गदर्शनात वरीष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांचे नेतृत्त्वात पो.उप. निरीक्षक गणेश राऊत, पोहेकॉ सतीश देशमुख, पोकॉ वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुददीन सैयद, निलेश साविकार, प्रफुल खोब्रागडे यांनी केली.

# मोर्शी पोलीसांनी घरफोडीच्या आरोपींचा 24 तासात लावला छडा

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

पोलीस स्टेशन मोर्शी येथे दिनांक ०४/०८/२०२६ रोजी फिर्यादी नामे सिताराम पुनाजी भानगे वय ६० वर्षे, रा पिंपळखुटा मोर्शी यांनी रिपोर्ट दिला की, ते बकऱ्या चारण्याची काम करीत असुन त्यांचे कुडाचे घर आहे. त्यांना घरबांधणे असल्याने त्यांनी त्यांच्या जवळच ८ बकऱ्या व्यापाऱ्याला विकल्या व त्याचे आलेले पैसे एकुण ९०,०००/- रूपये घरात पलंगाखाली एका लोखंडी संदुकमध्ये ठेवले त्यामध्ये त्यांच्या पत्नीचे एक मंगळसुत्र ज्याची किं १०,०००/- व पतीपत्नीचे महत्वाचे मुळ कागदपत्रे होते. फिर्यादी हे बकऱ्या चारण्या करीता घराला कुलुप लावुन सकाळी ११.०० वाजता निघुन गेले. सायंकाळी ०५.०० वाजताचे सुमारास बकऱ्या चारून घरी परत आले असता त्यांनी घराचा दरवाजा उघडला तेव्हा त्यांना त्यांच्या घरातील लाईट चालु दिसला म्हणुन त्यांना संशय आल्याने त्यांनी आजुबाजुला पाहीले असता त्यांना त्यांच्या घराच्या कुडाच्या भिंतीला मोठे छिद्र केलेले दिसुन आले व त्यांनी बकप्यांचे आलेल पैसे ज्या लोखंडी संदुक मध्ये ठेवले होते ते संदुकच दिसुन आले नाही कोणी तरी अज्ञात चारेट्याने त्यांच्या घराच्या कुडाच्या भिंतीला छिद्र पाडुन घरामध्ये प्रवेश करून दिनांक ०४/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० ते सायंकाळी १७.०० वाजताचे दरम्यान संदुक मध्ये ठेवलेले ९०,०००/- नगदी व एक सोन्याची पोत किं अं १०,०००/- रू संदुक किं अं ५००/- रू असा एकुण १,००,५००/- रू चा मुद्देमाल चारून नेला. असा रिपोर्ट पोलीस स्टेशन मोर्शी येथे दिल्यावरून पो स्टे मोर्शी येथे त्यांनी दिलेल्या रिपोर्ट वरून कलम ३३१ (३),३३१ (४) भारतीय न्याय संहीता अन्वये अज्ञात आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

पोलीस स्टेशन मोर्शी येथे दाखल झालेल्या गुन्हयाचे गांभिर्य लक्षत घेता प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल हुड यांनी तात्काळ घटनास्थळावर धाव घेत पोलीस स्टेशन मोर्शी येथील पोलीस निरिक्षक राहुल आठवले व त्यांचे अधिनस्त गुन्हे प्रकटीकरण पथकासह घटनास्थळी भेट देवुन प्रभारी उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल हुड यांनी घटनास्थळाची पाहणी करून गुन्हेप्रकटीकरण पथक मोर्शी यांना मार्गदर्शन करून आरोपी व मुद्देमालाचा शोध घेण्या बाबत निर्देशित केले.

# पोलिसांनी दिले विद्यार्थ्यांना प्रशिक्षण

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अमरावती :** राकेश ओला, पोलीस आयुक्त यांचे संकल्पनेतुन व यशवंत सोळंके, पोलीस उपायुक्त (परि-०१), शाम घुगे, पोलीस उपायुक्त (परि-०२), प्राजंली सोनवणे, पोलीस उपायुक्त (मुख्यालय) यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस आयुक्तालय अमरावती शहर तर्फे अमरावती शहरातील शालेय विद्यार्थीनी व महिलांच्या संबंधाने घडत असलेल्या अप्रिय घटना बघता प्रत्येक ठिकाणी अचानकपणे उदभवणाऱ्या संकटाच्या वेळी पोलीसांची किंवा जवळच्या व्यक्तीची मदत पोहचण्यापुर्वी प्रसंगावर मात करता यावी याकरिता स्वसंरक्षणार्थ शालेय विद्यार्थीना ३ दिवसीय कराटे प्रशिक्षण शिबीर, पोलीस कवायत मैदान, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर येथे आयोजित करण्यात आले होते. दि.४/८/२०२६ ते



दि.६/८/२०२६ रोजी पर्वत ३ दिवसीय स्वसंरक्षणार्थ कराटे प्रशिक्षण शिबीर राबविण्यात आले.

सदर शालेय प्रशिक्षण शिबीरामध्ये मनीबाई गुजराती हायस्कुल, शोभाबेन सेट्टीया हायस्कुल, वनिता समाज हायस्कुल, श्रीमती कस्तुरबा कन्या हायस्कुल, नारायणदास लढ्ढा हायस्कुल, श्री. गणेशदास राठी विद्यालय, श्री. शिवाजी बहुउद्देशिय उच्च माध्यमिक शाळा, सरस्वती विद्यालय, श्री. प्रेमकिशोर सिकची विद्यालय, महेश्वरी कनिष्ठ महाविद्यालय अमरावती येथील एकुण ९७० विद्यार्थीनीं व शिक्षक यांना स्वसंरक्षणार्थ प्रशिक्षण देण्यात आले आहे.

# मोठ्या प्रमाणात अवैध मेफेड्रान अंमली पदार्थाचा शहरात पुरवठा करणारा आंतरराज्य टोळीतील मुख्य सुत्रधार ताब्यात

## पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर यांची धडक कारवाई

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अमरावती:** मोठ्या प्रमाणात अवैध्यरित्या मेफेड्रान (एम.डी.) अंमली पदार्थाचा अमरावती शहरात पुरवठा करणारा आंतरराज्य टोळीतील मुख्य सुत्रधाराला राज्यस्थान येथुन ताब्यात घेतले आहे. पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर यांनी ही धडक कारवाई केली.

पोलीस आयुक्तां यांनी अमरावती शहरातील अवैधरित्या अंमली पदार्थाची साठवणुक, विकी व वाहतुक करणाऱ्या इसमांवर प्रभावी कार्यवाही करून अंमली पदार्थ विरोधात ZERO TOLERANCE POLICY राबविण्याबाबत आदेश प्राप्त झालेवरून पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण, पोलीस स्टेशन राजापेठ अमरावती शहर यांचे नेतृत्वात पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार नेमुन तसेच तांत्रिक विश्लेषनाच्या आधारे उल्लेखनिय अशी प्रभावी कार्यवाही केली आहे. 1 ऑगस्ट रोजी पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर यांनी सायंकाळी 7 वा. सुमारास मिळालेल्या गुप्त माहितीचे आधारे आरोपी साठील राजेश मेहस वय 22 वर्ष धंदा शिक्षण रा. शिवाजी संकुल, अकोली रोड, अमरावती यास ताब्यात घेवुन, एन.डी.पी.एस. कायदया अंतर्गत आरोपीची झडती घेतली असता, आरोपी जवळ, त्याचे ताब्यात मॅफेड्रॉन (एम.डी) पावडर किं. अं. 41,55,000/- रू., एक ईलेक्ट्रानिक वजन काटा किं. अं. 4,000/- रू, Eco sport चारचाकी वाहन किं.अं. 10,00,000/- रू., दोन APPLE कंपनीचे मोबाईल फोन किं. अ. 1,70,000/- रू. एक चमच, स्वळ व TARGET RE-LOCK LD BAGS कंपनीच्या पारदर्शक लहान पिशव्या असा एकुण एकुण किं.अं. 53,29,050/- रू. मुद्देमाल जप्त करून पोलीस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर येथे अपराध क्रमांक 697/2026 कलम 8(c), 21 (c), 22(c), 28, 29 एन.डी.पी.एस. ॲक्ट 1985 अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.




सदर गुन्हाची व्याप्ती ही मोठ्या प्रमाणात असल्याने, सदर गुन्डाचा तपास वरिष्ठ अधिकारी यांचे आदेशान्वये करत असतांना, नमुद आरोपी यांनी सदस्चा (एम.डी.) मेफेडॉन अंमली पदार्थ हा त्याने राज्य राजस्थान मधील आरोपी मोबाईल क्रमांक 8302472584 व 8003802990 (नाव माहिती नाही) याचे सोबत व्हॉटस ॲप द्वारे वारंवार संपर्क करून, आणल्याचे सांगितले होते.

सदर गुन्हाचे तपासात पोलीस आयुक्त यांचे मार्गदर्शनात व त्यांचे आदेशान्वये पाहीजे आरोपीचा शोथ घेण्यासाठी पोलिस स्टेशन राजापेठ, अमरावती शहर वे गुन्हे प्रकटिकरण पथक राज्य राजस्थान राज्यात जावुन तेथे काही दिवसापासुन रात्र दिवस सतत अथक परिश्रम व वेशांतर करून तेथील स्थांनीक पोलीसांचे सहाकार्याने तांत्रिक माहीतीचे आधारे पाहीजे आरोपी मोबाईल क्रमांक 8302472584 व 8003802990 पुर्ण नाव रामनिवास जगदिशकुमार बिशनोई वय 22 वर्ष रा. डुंगरवा तहसिल बागोडा, जिल्हा जालौर राज्य राजस्थान याचाn शोथ तांत्रीक माहीतीच्या विश्लेषनाच्या आधारे आरोपी यास पोलीस ठाणे जालौर जिल्हा जालौर, राज्य राजस्थान येथुन ताब्यात घेतले आहे व पाहिजे आरोपी शियम हा फरार झाला आहे.

सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त श्याम घुगे, सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे, यांचे मार्गदर्शनात पोलीस स्टेशन राजापेठ चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. नितीन शिंदे, पोलीस अंमलदार मनिष करपे, पंकज खटे, रवि लिखितकर, शशीकांत शेळके, पवन तिवारी, अर्जुन कदम, रफिक खान, अंकुश काळे, पंकज गाठे, आकाश यादव, प्रशांत बोलोस्कर, अमोल देशमुख यांनी केली आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ http://epaper.citynewssuperfast.com



# रस्त्यावरचे काढले पक्के नाही पाडले

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●


शहराला अतिक्रमणच्या विळाख्यातून बाहेर काढण्यासाठी अतिक्रमण मोहिमेला दि. ५ ऑगस्ट पासून डॉ.ऑबेडकर चौकातून सुरूवात करण्यात आली. दुसऱ्याही दिवशी अतिक्रमण हटाव मोहिम सुरूच असून ही मोहिम बसस्थानक परिसरातील अतिक्रमण हटाव करीत आहेत. मात्र काही अतिक्रमण धारकांनी दोन दिवसापासूनच स्वयंमस्फूर्तीने अतिक्रमण काढायला सुरूवात केली आहे. अतिक्रमण हटाव मोहिमेत रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यात येत आहे. मात्र श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण अद्यापही नाही पाडले. त्यामुळे श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडा अशी मागणी शहरवासीयांकडून होत आहे. शहरातील रस्त्यावरील अतिक्रमण हटल्यामुळे रस्त्यांनी मोकळा श्वास घेतला आहे. तर ही मोहिम खास ठरत आहे.



# अतिक्रमण हटाव मोहीम खास, रस्त्याने घेतला मोकळा श्वास !

## नगर पालिकेचा आला गाडा, गरिबांचे झोपडे मोडा, रस्त्यावरचे काढा अन् पक्केही पाडा










### इतरही अतिक्रमण काढावे



वाशीम शहर अतिक्रमणामुळे व अस्वच्छतेमुळे भकास झाले आहे. शहरातील रस्त्यांना अतिक्रमणाने घेरले असून त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत होता. तर अस्वच्छतेने नागरिक त्रस्त झाले आहे. यावर उपाय म्हणून जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर न.प. मुख्यधिकारी अरविंद मुंढे, उपमुख्यधिकारी वसंत पाटील, बांधकाम अभियंता निखील चव्हाण, पाणी पुरवठा अभियंता गजानन हिरेमठ, अधिक्षक राहुल मारकड, करनिरीक्षक स्वप्नील इंगोले, आरोग्य निरीक्षक सुदाम चव्हाण, लेखा अधिकारी योगेश मांदळे, करसंग्राहक मुन्ना खान, राम वानखेडे, शहर अभियान व्यवस्थापक पंडीत यासह न.प.चे कर्मचारी उपस्थित होते. शहराच्या विकासाच्या दृष्टीने वेगवेगळे पावले उचलत असून आता अतिक्रमण हटाव मोहिमेच्या माध्यमातून पुन्हा रस्त्यावर उतरल्या आहेत. डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौकापासून अतिक्रमण हटाव मोहिमेला प्रारंभ झाला आहे. मात्र रस्त्यावरील अतिक्रमण हटाव मोहिमेनंतर कायम स्वरूपी शहरातील पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी शहर वासियांकडून होत आहे.

### पुर्ण शहरच मोकळे करावे

अतिक्रमण हटाव मोहिम ही नेहमी सारखी न राबविता कायम स्वरूपी राबवावी. कारण हे अतिक्रमण धारक पुन्हा काही दिवसानंतर जैसे थे करीत पुन्हा अतिक्रमण करतात. या काही अतिक्रमण धारकांनी अतिक्रमण करून भाड्याने दिले आहे. रस्त्यावरील अतिक्रमण न काढता पार्कींगच्या जागेवर केलेले पक्के अतिक्रमण, सरकारी जागेवर केलेले पक्के अतिक्रमण कायम स्वयंमस्वरूपी काढण्याची मागणी होत आहे.

### अनेक वेळा राबविण्यात येते अतिक्रमण हटाव मोहिम...

शहराला अतिक्रमणच्या विळाख्यातून बाहेर काढण्यासाठी अतिक्रमण हटाव मोहिम या पुर्वी ही अनेक वेळा राबविण्यात आली. मात्र अतिक्रमण हटविल्यानंतर काही दिवसातच पुन्हा जैसे थे परिस्थिती होते. अतिक्रमणामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होतो. त्यामुळे कायम स्वरूपी अतिक्रमण हटाव मोहिम राबवून श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण पाडण्याची मागणी होत आहे.

## थोडक्यात

### केनवड येथे नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर




● सिटी न्युज ब्युरो @ केनवड ●

ग्रामीण भागातील गरजू नागरिकांना दर्जेदार नेत्रसेवा उपलब्ध करून देत अंधत्वमुक्त समाज घडविण्याच्या उद्देशाने स्व. डॉ. ज्ञानेश्वर केशवराव शेवाळे यांच्या २७ व्या पुण्यस्मरण दिनानिमित्त केनवड येथे भव्य नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरातून गरजू रुग्णांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणीसह मोफत शस्त्रक्रियेचा लाभ मिळणार असल्याने परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

रोटरी क्लब ऑफ बॉम्बे हँगिंग गार्डन, मुंबई व दमाणी हॉस्पिटल, अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर सोमवार, दि. १० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत डॉ. गणेश राठोड यांच्या नवीन दवाखान्यात, मालेगाव रोड, केनवड, ता. रिसोड, जि. वाशिम येथे होणार आहे. शिबिरात तपासणीदरम्यान मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांवर दमाणी नेत्र रुग्णालय, अकोला येथे लेन्स टाकून अत्याधुनिक पद्धतीने मोफत शस्त्रक्रिया करण्यात येणार आहे. शस्त्रक्रियेसाठी निवड झालेल्या रुग्णांनी आधार कार्डाची प्रत व ५०० रुपये अनामत शुल्क जमा करणे आवश्यक असून, शस्त्रक्रियेनंतर उपस्थित राहिल्यास ही रक्कम परत करण्यात येणार आहे.या शिबिरात डॉ. सभापती शुक्ला (डायरेक्टर, दमाणी हॉस्पिटल), डॉ. मनीषजी हर्षे (मुख्य शल्यचिकित्सक), डॉ. सौरभ इंगोले व डॉ. शरद बडुरे (नेत्ररोग तज्ज्ञ) यांचे विशेष सहकार्य लाभणार आहे.शिबिराचे आयोजन माधव वामनराव शेवाळे व डॉ. गजानन बाजड यांनी केले असून, अधिक माहितीसाठी ९६५७१३४३३३, ९३५६९९१५९५ आणि ९८२२२४१५२१ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### मतदार यादी पुनरीक्षणात राजकीय पक्षांनी सहकार्य करावे

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार वाशिम जिल्ह्यातील तिनही विधानसभा मतदारसंघांमध्ये सुरू असलेल्या विशेष सखोल पुनरीक्षण (एसआयआर) कार्यक्रमाच्या अनुषंगाने राजकीय पक्षांच्या पदाधिकारी व प्रतिनिधींची बैठक घेण्यात आली.

बैठकीत आयोगाच्या दि. ४ ऑगस्ट २०२६ रोजीच्या पत्रान्वये जाहीर करण्यात आलेल्या सुधारित कार्यक्रमाची माहिती देण्यात आली तसेच कार्यक्रमाची प्रत उपस्थितांना वितरित करण्यात आली. यावेळी मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांकडून दि. ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ या कालावधीत गृहभेटी घेण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. दि. १७ ऑगस्ट रोजी मतदान केंद्रांचे सुसूत्रीकरण व पुनर्रचना, दि. २४ ऑगस्ट रोजी प्रारूप मतदार याद्यांचे प्रकाशन, तर दि. २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. त्यानंतर दि. २२ ऑक्टोबरपर्यंत दावे व हरकती निकाली काढून दि. २७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.

# अतिक्रमण : गरीबांचे काढतात, श्रीमंतांचे सोडतात !

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शासन श्रीमंतांनी तक्रार केली तर गरीबांचे अतिक्रमण क्षणात काढते, गरीबांचा संसार उघड्यावर आणते. नगर पालिकाही गरीबांचे अतिक्रमण काढून छोट्या व्यवसायीकांना व गरीबांना रस्त्यावर आणते. मात्र, श्रीमंतांचे पक्के अतिक्रमण १३ वर्षापासून तक्रार करूनही काढत नसल्याने अधिकारी गरीब श्रीमंत असा भेदभाव करीत असल्याचे सिध्द झाले आहे. त्यामुळे अधिकाऱ्यांने तरी गरीबाबरोबर श्रीमंतांचेही पक्के अतिक्रमण पाडावे व कायद्याचे पालन करावे अशी मागणी सुभाष देव्हढे यांनी केली आहे. त्यामुळे शासनाने गरीब श्रीमंत असा भेदभाव न करता सर्वांना समान कायद्यानुसार न्याय द्यावा.

## गरीब, श्रीमंत असा भेदभाव करतात





राजस्थान शिक्षण संस्थेच्या कथित संस्थाचालकांना राजाश्रय असल्यामुळे वाशीम जिल्ह्यातील जबाबदार असलेल्या महसूल प्रशासनाने मौनव्रत धारण केल्याचे चित्र आहे.या शासकीय जागेवर थाटात बांधलेल्या आणि अद्यापही वापरात नसलेल्या मुलींच्या वसतीगृहाचे बांधकाम जमीनदोस्त करण्याच्या मागणीसाठी सुभाष देवढे पाटील तब्बल १३ वर्षांनी पुन्हा आक्रमक झाले आहेत. वाशीम शहरातीलच नव्हेतर जिल्ह्यातील उच्च शिक्षणासाठी नावारूपास आलेल्या राजस्थान आर्य कला,मिठुलालजी कचोलिया वाणिज्य आणि एस.आर.राठी विज्ञान महाविद्यालय, रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालयाची मोठ्ठी टोलेजंग ईमारत वाशीम-काटा रस्त्यावर थाटात उभी आहे. हे महाविद्यालय राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळ,वाशीम या संस्थेमार्फत सुरू आहे. याच महाविद्यालयाच्या समोरच्या भागात जवाहर नवोदय विद्यालयाला लागूनच असलेल्या शासकीय जागेवर राजस्थान महाविद्यालयाने खेळाच्या मैदानासाठी अतिक्रमण केलेले आहे.याच जागेतील १० हजार फुटापेक्षा जास्त जागेवर विद्यापीठ अनुदान आयोगाने मुलींच्या वसतीगृहाच्या बांधकामासाठी दिलेल्या कोट्यवधीच्या अनुदानातून राजस्थान शिक्षण प्रसारक मंडळाच्या कथित संचालकांनी मुलींचे वसतीगृह २०१० साली बांधले आहे. हे बांधकाम पुर्णत: बेकायदेशीर असल्याचा आरोप तक्रारकर्ते सुभाष देवढे पाटील यांनी केला आहे. या प्रकरणी सर्वप्रथम २०१३ मध्ये सुभाष देवढे पाटील यांनी जिल्हाधिकारी, वाशीम यांचेकडे तक्रार केली होती.पाठपुरावा पण केला.तसेच दिवंगत आमदार विनायकराव मेटे यांनी विधानसभेतही हा प्रश्न उपस्थित करून ' या' राजाश्रय असलेल्या अतिक्रमणाला जमीनदोस्त करण्याची मागणी केली होती. परंतु महसूल प्रशासनाने अद्यापपर्यंत ' या' अतिक्रमणाला त्यांचा पाठींबा देवून मौनव्रत धारण केल्याचे वास्तव आहे.

शासकीय जागेवर गरीबांचे झोपडे असले तर तात्काळ ते झोपडे हटवण्यासाठी सर्व महसूल प्रशासन एका ठिकाणी येवून ते झोपडे काढण्यासाठी पुढाकार घेते.परंतु राजाश्रय असलेल्या कथित संस्थाचालकांनी अतिक्रमण करून नियमबाह्य ,बेकायदेशीर बांधकाम केलेल्या मुलींच्या वसतीगृहाची टोलेजंग ईमारत जमीनदोस्त करण्यासाठी आणि ती शासकीय जागा ताब्यात घेण्यासाठी केव्हा पुढाकार घेणार असा प्रश्नही देवढे पाटील यांनी उपस्थित केला आहे.

### १३ वर्षाचा लढा, अतिक्रमण काढा

शासकीय जागेवर अनाधिकृत बांधकाम करून वसतीगृहाच्या नावावर कोट्यवधीचे अनुदान घेवून शासनाची व जनतेची फसवणूक करणाऱ्या आर्य शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाची व अधिकाऱ्यांची मिलीभगत असून यामध्ये कोट्यवधीची फसवणूक झाली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्ते सुभाष देव्हढे यांनी १३ वर्षापासून लढा देत आहेत. विविध आंदोलन व उपोषण, निवेदनातून अतिक्रमण काढण्याची मागणी करीत आहेत.




## भगवान दादांचा विकास ध्यास; रिसोडचा विकास, मुख्यमंत्र्यांचा ठाम विश्वास!

### रिसोड शहर विकास आराखड्याला गती; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून निधीचे आश्वासन

● खाजा शेख @ रिसोड ●



रिसोड शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी गती मिळण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. शहर विकास आराखड्याला मंजुरी व निधी मिळवून देण्यासाठी नगराध्यक्ष भगवान दादा क्षिरसागर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले. या भेटीत मुख्यमंत्र्यांनी विकास आराखड्याचे कौतुक करत संबंधित विभागांना प्रस्तावांचा तातडीने आढावा घेण्याचे निर्देश देत निधीबाबत सकारात्मक भूमिका घेतल्याने रिसोडच्या विकासाच्या अपेक्षा अधिक बळावल्या आहेत. रिसोड शहराचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी तयार करण्यात आलेल्या 'रिसोड शहर विकास आराखड्या' ला मंजुरी व निधी मिळवून देण्यासाठी रिसोड नगर परिषदेचे नगराध्यक्ष भगवान दादा क्षिरसागर यांनी मुंबई येथे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची त्यांच्या शासकीय कार्यालयात भेट घेऊन सविस्तर निवेदन सादर केले.यावेळी नगराध्यक्षांनी शहराच्या विकासासाठी प्रस्तावित विविध महत्त्वाच्या कामांची माहिती मुख्यमंत्र्यांना दिली. त्यामध्ये शहरातील अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली व सांडपाणी व्यवस्थेचे सक्षमीकरण, वाढत्या लोकसंख्येनुसार नवीन पाणीपुरवठा योजना व जलकुंभ उभारणी, उद्याने, सभागृह व व्यापारी संकुलांची निर्मिती तसेच शहराचे सुशोभीकरण, भव्य प्रवेशद्वार उभारणी आणि पर्यटन व रोजगारवाढीसाठी आवश्यक सुविधा उभारण्याचा समावेश आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रिसोड शहर विकास आराखड्याचे कौतुक करत संबंधित विभागांना प्रस्तावांचा तातडीने आढावा घेण्याचे निर्देश दिले. तसेच विकासकामांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यासाठी राज्य शासन सकारात्मक असून, रिसोड शहराच्या विकासासाठी निधीची कमतरता पडू देणार नाही, असे आश्वासनही त्यांनी दिले. विविध विकासकामांचे प्रस्ताव तातडीने सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.नगराध्यक्ष भगवान दादा क्षिरसागर म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच माजी मंत्री अनंतराव देशमुख, खासदार अनुपजीत धोत्रे आणि विधान परिषद सदस्य भावनाताई गवळी यांच्या नेतृत्वामुळे रिसोड शहराचा विकास आराखडा प्रत्यक्षात साकार होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या आराखड्यामुळे शहराचे रूप पालटून नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा उपलब्ध होतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या सकारात्मक प्रतिसादाबद्दल त्यांनी रिसोडकरांच्या वतीने आभार मानले. या भेटीप्रसंगी वाशिम विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्यामभाऊ खोडे, स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांच्या सकारात्मक भूमिकेमुळे रिसोड शहराच्या विकासाला नवसंजीवनी मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

### देशातील १७ राज्यांतील १२१ शिक्षकांमध्ये वाशीमच्या सुनील खोटे यांची निवड

#### CCRT च्या राष्ट्रीय प्रशिक्षणात यशस्वी सहभाग

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

सांस्कृतिक मंत्रालय, भारत सरकार अंतर्गत कार्यरत सांस्कृतिक संसाधन आणि प्रशिक्षण केंद्र (ण्ण्ॅऊ), नवी दिल्ली यांच्या वतीने २७ जुलै ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत आयोजित पाच दिवसीय उजळणी अभ्यासक्रमासाठी देशातील १७ राज्यांमधून १२१ शिक्षकांची निवड करण्यात आली होती. या प्रतिष्ठित प्रशिक्षणासाठी वाशिम जिल्ह्यातील श्री शिवाजी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, मोप येथील शिक्षक श्री सुनील खोटे यांची निवड होणे ही जिल्ह्यासाठी अभिमानाची बाब ठरली.या पाच दिवसीय प्रशिक्षणादरम्यान शिक्षण, कला, संस्कृती, काव्य, नाट्य, बाहुलीकला, शिल्पकला, अभिनव अध्यापन, आरोग्य आणि योग यांसारख्या विविध विषयांवरील तज्ज्ञांची मार्गदर्शनपर कार्यशाळा आयोजित करण्यात आली. तसेच कागदापासून आकर्षक वस्तू तयार करणे, मातीपासून कलाकृती बनविणे आणि टाकाऊ वस्तूंपासून टिकाऊ वस्तू तयार करण्याच्या प्रात्यक्षिक कार्यशाळाही घेण्यात आल्या.या प्रशिक्षणात प्रा. भरत गुप्ता, सीमा वही मुखर्जी, डॉ. मालविका जोशी, डॉ. चारू स्मिता गुप्ता, डॉ. पुलकित जावा आणि डॉ. संजीव आदी मान्यवर विषयतज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. प्रशिक्षणाचा एक भाग म्हणून ऐतिहासिक कुतुब मिनारला शैक्षणिक भेट देण्यात आली. तेथील ऐतिहासिक व सांस्कृतिक माहितीचे संकलन करून त्यावर अहवाल तयार करण्याचाही उपक्रम राबविण्यात आला. प्रशिक्षणादरम्यान विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले असून सर्व शिक्षकांनी उत्साहाने सहभाग नोंदविला. समारोप प्रसंगी ण्ण्ॅऊ चे प्रमुख श्री इंदुलकर यांच्या हस्ते सर्व सहभागी शिक्षकांना प्रमाणपत्र प्रदान करून गौरविण्यात आले.

# डॉक्टरांच्या बंदमुळे आरोग्यसेवा प्रभावित; 'आयएमए'च्या आंदोलनाला प्रतिसाद

## नोंदणीच्या निर्णयाविरोधात खामगावात तीव्र नाराजी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**खामगाव :** इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्रच्या राज्यव्यापी बंदच्या हाकेला प्रतिसाद देत खामगाव शहरासह जिल्ह्यातील बहुतांश खासगी रुग्णालये आणि दवाखान्यां मधील नियमित आरोग्यसेवा गुरुवारी ठप्प झाली होती. बाह्यरुग्ण विभाग (ओपीडी) बंद राहिल्याने तपासणीसाठी आलेल्या अनेक रुग्णांना परत जावे लागले. राज्य सरकारच्या निर्णयाविरोधातील या आंदोलनामुळे आरोग्यसेवेवर मोठा परिणाम झाल्याचे चित्र दिसून आले. इंडियन मेडिकल असोसिएशन (आयएमए) महाराष्ट्र राज्याने ६ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजल्यापासून राज्यव्यापी बंदची हाक दिली होती. या आंदोलनाला जिल्ह्यातील खासगी वैद्यकीय व्यावसायिकांनी प्रतिसाद दिल्याने अनेक रुग्णालये आणि दवाखान्यां मधील नियमित ओपीडी सेवा बंद ठेवण्यात आल्याचे चित्र दिसून आले.

सीसीएमपी अभ्यासक्रमा वरून वाद का?

राज्य सरकारने सीसीएमपी अभ्यासक्रम पूर्ण केलेल्या बीएचएमएस डॉक्टरांना महाराष्ट्र मेडिकल कौन्सिलमध्ये नोंदणी देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे संबंधित डॉक्टरांना आधुनिक वैद्यकाच्या काही क्षेत्रांत काम करण्याचा मार्ग खुला होईल, अशी भूमिका शासनाची आहे. मात्र, हा अल्पकालीन प्रमाणपत्र अभ्यासक्रम असून तो आधुनिक वैद्यकाच्या पदवीसमान नसल्याचा दावा 'आयएमए'ने केला आहे.

### शेगावात डॉक्टरांचे २४ तास सेवा बंद आंदोलन

» शेगाव शाखेने ही आंदोलनात सहभाग घेतला आहे. आयएमए शेगाव शाखेचे अध्यक्ष डॉ. रमेश भुतडा व सचिव डॉ. मयूर वाडे यांनी तहसीलदारां मार्फत जिल्हाधिकारी, बुलढाणा यांना निवेदन सादर केले. निवेदनावर डॉ. रमेश भुतडा, डॉ. मयूर वाडे, डॉ. मोहन बानोले, डॉ. प्रवीण नागरगोजे, डॉ. राजेश सराफ, डॉ. सबा हुसैन, डॉ. अश्विनी बढे, डॉ. विनय अग्रवाल, डॉ. अयान हुसैन, डॉ. अख्तर हुसैन, डॉ. प्रशांत बढे, अश्विनी बढे, डॉ. अंजुषा भुतडा, डॉ. सचिन सांगळे, डॉ. गणेश खटोड आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# ग्रामसेवकाच्या निष्काळजी, हलगर्जीपणामुळे पात्र शेतकरी लाभापासून वंचित

## चौकशी करून निलंबन करण्याची रा.कॉ जिल्हा कार्याध्यक्ष यांची मागणी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**मलकापुर :** तालुक्यातील ग्राम धानोरा येथील ग्रामसेवकाने शासनाच्या गहू अनुदान योजनेत गंभीर निष्काळजीपणा व हलगर्जीपणा करून पात्र शेतकऱ्यांना लाभापासून वंचित ठेवले असून त्याची तात्काळ चौकशी करून त्यांचेवर निलंबन करून कठोर प्रशासकीय कारवाई करण्याची मागणी रा.कॉ (अजीत पवार)जिल्हा कार्याध्यक्ष प्रसाद जाधव यांनी उपविभागीय अधिकारी संतोष शिंदे यांचे कडे आज एका निवेदनाद्वारे केली आहे. निवेदनात नमूद केले आहे की, मौजे धानोरा येथील ग्रामसेवक ढोटे यांनी शासनाच्या गहू अनुदान योजनेसाठी पात्र असलेल्या अनेक शेतकऱ्यांची नोंदणी जाणीवपूर्वक निष्काळजीपणा मुळे वेळेत केली नाही. परिणामी अनेक पात्र शेतकरी शासनाच्या अनुदानापासून वंचित राहिले असून त्यांचे मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसान झाले आहे. ही बाब अत्यंत गंभीर असून शासनाच्या जनकल्याणकारी योजनांच्या अंमलबजावणीत झालेल्या निष्काळजीपणाचे द्योतक आहे. सदर प्रकरणाची वरिष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करण्यात यावी, संबंधित ग्रामसेवकाच्या कार्यपद्धतीची तपासणी करून दोषी आढळल्यास त्याच्यावर तात्काळ निलंबनासह कठोर प्रशासकीय व शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच या निष्काळजीपणामुळे लाभापासून वंचित राहिलेल्या सर्व पात्र शेतकऱ्यांना तातडीने अनुदानाचा लाभ मिळवून देण्यासाठी विशेष कारवाई करण्यात यावी. या प्रकरणाची चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित ग्रामसेवकांकडे अभिलेख व नोंदणीची तपासणी करून कोणताही पुरावा नष्ट होणार नाही याची खबरदारी घ्यावी. दोषींना पाठीशी घालण्याचा कोणताही प्रयत्न होऊ नये व शेतकऱ्यांना न्याय मिळावा यासाठी आपण तातडीने कठोर कारवाई करावी अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. अन्यथा शेतकऱ्यांच्या न्याय हक्कासाठी लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशाराही रा.कॉ(अजित पवार) जिल्हा कार्याध्यक्ष प्रसाद जाधव यांनी एका निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर शंकर सुखदेव दांडगे, गीतांजली प्रसाद जाधव, प्रकाश उखर्डा वानखेडे, विष्णू अभिमान वानखेडे, महादेव अभिमान वानखेडे, अमोल अभिमान वानखेडे, सुमन निवास वानखेडे, कमलाबाई मुरलीधर वानखेडे, सुभाष उखर्डा वानखेडे,गौतम गुनराज पाटील, प्रतिभा अभय पाटील, उत्तमराव निनाजी पाटील, तानाबाई धोंडूराम दांडगे, सारंगधर महिपत राखोंडे, शालिकराम नथू नरवाडे, सुवर्णा संजय नरवाडे, लक्ष्मण दामाजी चोपडे, भास्कर दांडगे, रामराव संपत नरवाडे, श्रीकृष्ण रामभाऊ येनकर, प्रमिलाबाई नारायणराव जाधव सह आदी शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या नमूद आहे.

# शेगाव बसस्थानकाजवळ बसची कारसह सायकलला धडक

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**शेगाव :** बसस्थानकाच्या शहरातील बाहेरील प्रवेशद्वाराजवळ मेडिकलसमोर बुधवारी दुपारी एसटी बसने कार व सायकलला धडक दिल्याने १४ वर्षीय मुलगी जखमी झाली. या अपघातात कार आणि सायकलचेही नुकसान झाले असून, एसटी चालकाविरुद्ध शेगाव शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, दि. ५ ऑगस्ट रोजी दुपारी २ वाजेच्या सुमारास फिर्यादी योगेश रामधन वावरे (वय २४, रा. लोहारा, ता. बाळापूर, जि. अकोला) हे त्यांच्या चारचाकी वाहनाने जात असताना मागून आलेल्या एसटी बस (क्र. एमएच ४० वाय ५०४२) चालकाने भरधाव व निष्काळजीपणे बस चालवत त्यांच्या कारच्या उजव्या बाजूच्या डिक्कीला धडक दिली. या अपघातात कारचे सुमारे १० हजार रुपयांचे नुकसान झाले. दरम्यान, त्याच बसने वैष्णवी दिनेश अबीलकर (वय १४) हिच्या सायकललाही धडक दिली. या अपघातात वैष्णवी जखमी झाली असून, तिच्या सायकलचे सुमारे ४ हजार रुपयांचे नुकसान झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. फिर्यादीच्या तक्रारीवरून शेगाव शहर पोलिस ठाण्यात एसटी चालकाविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५ (अ) आणि ३२४(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला

# लॉयन्स क्लब व धन्वंतरी चॅरीटेबल तर्फे आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी प्रस्ताव आमंत्रीत

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**खामगांव:** सामाजिक कार्यात सदा अग्रेसर असणाऱ्या लॉयन्स क्लब खामगांव व धन्वंतरी चॅरिटेबल मेडीकल फाऊंडेशनच्या वतीने स्व. श्र.स. बावस्कर गुरुजी स्मृतीप्रित्यर्थ देण्यात येणाऱ्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे हे तेरावे वर्ष आहे. त्यासाठी बुलडाणा जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन तसेच अंध-अपंग, मुकबधीर, आदिवासी शाळांमध्ये विशेष उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व सोबतच सेवानिवृत्तीनंतरही सामाजिक कार्यात सक्रीय असणाऱ्या शिक्षकांकडून सदर प्रस्ताव आमंत्रित करण्यात येत आहेत. लॉयन्स क्लबचे माजी प्रांतपाल डॉ. अशोक श्रावण बावस्कर यांच्या संकल्पनेतून सुरु करण्यात आलेल्या ह्या जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी जिल्ह्यातील शिक्षकांकडून प्रस्ताव आमंत्रीत करण्याचे आवाहन लॉयन्स क्लब खामगांवच्या वतीने करण्यात आले आहे. ५००१ रु. रोख व सन्मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरुप असून ह्या पुरस्कारासाठी निवड झालेल्या शिक्षकांचा सपत्नीक सत्कार करुन पुरस्कार प्रदान केल्या जातो. पुरस्कारासाठी शहरी व ग्रामिण भागात इयत्ता १ ली ते ७ वी तसेच इयत्ता ८ वी ते १२ वी असे प्रत्येकी दोन गट करण्यात आले आहेत. प्रत्येक गटामधून एक शिक्षक वा शिक्षिका असे एकुण चार पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहेत. अंध, अपंग, मुकबधीर व आदीवासी आश्रम शाळेत विद्यादानाचे पवित्र कार्य करणाऱ्या शिक्षक वा शिक्षीकांमधून एक असा विशेष पुरस्कार देण्यात येणार आहे. तसेच सेवानिवृत्तीनंतर ही सामाजिक कार्यात सक्रीय असलेल्या गुरुजनांपैकी उल्लेखनीय कार्य करणाऱ्या एका सेवानिवृत्त शिक्षकास पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. सोबतच पदवीधर महाविद्यालयात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व शैक्षणिक उपक्रमात अग्रेसर असणाऱ्या महाविद्यालयीन प्राध्यापक / प्राध्यापिका पैकी एकास विशेष पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. यासाठी विहित नमुन्यात दि. १० सप्टेंबर २०२६ पर्यंत प्रस्ताव आमंत्रीत केले आहेत. प्रस्ताव विहीत नमुन्यात हार्ड कॉपी, सॉफ्ट कॉपी स्परुपात ई-मेल व मो.नं. ९४२२१८०९०८ या व्हॉटस्अप नंबरवर सुध्दा स्विकारण्यात येतील. प्रस्तावाची सॉफ्ट कॉपी प्राप्त करण्यासाठी तसेच विस्तृत माहिती तथा नाव नोंदणी व प्रस्ताव सादर करणेसाठी लॉ. डॉ. अशोक बावस्कर, अक्षय हॉस्पीटल, सिव्हील लाईन, खामगांव मो. नं. ९४२२१८०९०८, लॉयन्स क्लब अध्यक्ष लॉ. पिनेश कमाणी मो.नं. ९९२२८७०७८४, क्लब सचिव लॉ. श्रमिक जैसवाल मो.नं. ९४२३४४५२०२, क्लब कोषाध्यक्ष लॉ. सागर गुर्जर मो.नं. ९४२२१००९२५ तसेच श्री. के. ओ. बावस्कर गुरुजी, बुलडाणा मो.नं. ९२७२९५८१२५, अक्षय मेडीकल, सिव्हील लाईन, खामगांव मो. ९२७३४५७३३३ यांच्याशी संपर्क साधावा असे आवाहन लॉयन्स क्लब खामगांवचे प्रसिध्दी प्रमुख यांचे वतीने करण्यात आले आहे.

# बनावट जातवैधता; थेट फौजदारी कारवाई अन् 50 हजारांपर्यंत दंड !

## कुटुंबातील सदस्यांच्या प्रमाणपत्रांची होणार फेरतपासणी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**खामगाव :** बनावट कागदपत्रे किंवा सक्षम अधिकाऱ्यांच्या खोट्या स्वाक्षऱ्यांचा वापर करून बनावट जातवैधता प्रमाणपत्र मिळवणाऱ्यांवर आता थेट फौजदारी गुन्हे दाखल केले. जाणार आहेत, तसेच दोषींना ५० हजार रुपयां पर्यंतचा दंड ठोठावण्याची कडक तरतूद कायद्यात सुधारणा करून करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, अशा प्रकरणांत गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवरही कारवाई होणार असल्याने प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. मागील काही काळापासून खोट्या कागदपत्रांच्या आधारे आणि स्वाक्षऱ्यांचा गैरवापर करून जातवैधता प्रमाणपत्र लाटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले होते. यामुळे अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय अशा मूळ व पात्र लाभार्थ्यांच्या हक्कांवर गदा येत होती. या गंभीर बाबीची दखल घेत सरकारने जात प्रमाणपत्र पडताळणी कायद्यात महत्त्वपूर्ण सुधारणा केली आहे. नवीन सुधारणे नुसार, बनावट जातवैधता प्रमाणपत्र मिळवणाऱ्या व्यक्तीवर केवळ कारवाई होणार नाही, तर त्याच्या कुटुंबातील इतर सदस्यांना मिळालेल्या प्रमाणपत्रांचीही फेरतपासणी केली जाणार आहे.

# कर्ज फेडणाऱ्या 7,288 शेतकऱ्यांना 1.68 कोटींचा व्याज परतावा

## बुलढाणा जिल्हा बँकेला केंद्राकडून निधी प्राप्त

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**बुलढाणा :** पीक कर्जा ची मुदतीत परतफेड करणाऱ्या बुलढाणा जिल्ह्यातील ७ हजार २८८ शेतकऱ्यांना केंद्र सरकारच्या तीन टक्के व्याज प्रोत्साहनाचा लाभ मिळणार आहे. त्यासाठी १ कोटी ६८ लाख ५२ हजार २१७ रुपयांचा निधी बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेला प्राप्त झाला असून, पुढील दोन दिवसांत पात्र शेतकऱ्यांच्या बचत खात्यांवर ही रक्कम थेट जमा केली जाणार आहे. बुलढाणा जिल्हा केंद्रीय सहकारी बँकेशी संलग्न ग्रामसेवा सहकारी संस्थांमार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षात अल्पमुदतीचे पीककर्ज घेतलेल्या आणि निर्धारित मुदतीत त्याची परतफेड केलेल्या सभासद शेतकऱ्यांना हा लाभमिळेल. संबंधित शेतकऱ्यांच्या पात्रतेची पडताळणी पूर्ण करून रक्कम जमा करण्याची प्रक्रिया बँकेने सुरू केली आहे.

व्याजसवलत योजनेअंतर्गत किसान क्रेडिट कार्डाद्वारे शेतकऱ्यांना तीन लाख रुपयांपर्यंतचे अल्पमुदतीचे पीककर्ज वार्षिक सात टक्के दराने उपलब्ध होते. कर्जाची निर्धारित मुदतीत परतफेड करणाऱ्या शेतकऱ्याला अतिरिक्त तीन टक्के 'तत्पर परतफेड प्रोत्साहन' दिले जाते. त्यामुळे पात्र शेतकऱ्यावरील प्रत्यक्ष व्याजभार सातवरून चार टक्क्यांपर्यंत खाली येतो. केंद्र सरकारकडून बँकेमार्फत दिली जाणारी ही रक्कम कर्जमाफी नसून, कर्जफेडीला प्रोत्साहन देणारा व्याज परतावा आहे.

# श्रावण महिना ऐन तोंडावर; उपवासाच्या पदार्थांनी वाढवली महागाईची झळ

## साबुदाणा, भगर, साखर सह फराळ साहित्याचे भाव वधारले!

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**खामगाव :** श्रावण महिन्याची सुरुवात १३ ऑगस्टपासून होत असून, घरोघरी लागणाऱ्या व्रत-उपवासाची तयारी सुरू आहे. मात्र, यंदा उपवासासाठी साहित्याच्या दरात झालेल्या वाढीमुळे सर्वसामान्यांचे आर्थिक गणित बिघडले आहे. साबुदाणा, भगर, साखर, खाद्यतेल यांसह अनेक वस्तूंचे दर वाढल्याने उपवासाचा खर्च लक्षणीय वाढला आहे. गेल्या पंधरा दिवसांपासून उपवासाच्या साहित्याला मागणी वाढल्याने बाजारात तेजीचे वातावरण आहे.

आषाढी एकादशीच्या तुलनेत भगर, साबुदाणा आणि साखरेच्या किमतीत वाढ झाली आहे.श्रद्धे पुढे महागाई ही फिकी उपवासाच्या साहित्याचे भाव वाढले असले तरी धार्मिक श्रद्धेमुळे ग्राहकांची खरेदी कायम आहे; मात्र पूर्वीप्रमाणे मोठ्या प्रमाणात खरेदी करण्याऐवजी गरजेनुसार कमी प्रमाणात साहित्य घेण्याकडे ग्राहकांचा कल वाढल्याचे व्यापारी सांगतात. दरवाढीची कारणे श्रावण महिन्यापूर्वी उपवासाच्या साहित्याला मागणी वाढणे, घाऊक बाजारातील तेजी आणि पुरवठा खर्चात झालेली वाढ यामुळे किरकोळ बाजारातील दर चढले आहेत. मागणी वाढल्याने व्यापाऱ्यां कडून ही वाढीव दराने विक्री होत असल्याचे दिसत आहे.

# मेहकरात दोन दुकाने फोडून दागिने, रोकड लंपास

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**मेहकर :** शहरातील मुख्य बाजारपेठेतील श्रीकृष्ण ज्वेलर्स आणि विठ्ठल नगरातील मेडिकल स्टोअर चे शटर तोडून अज्ञात चोरट्यांनी चांदीचे दागिने, सीसीटीव्ही डीव्हीआर आणि रोकड लंपास केली. या घटनांमुळे व्यावसायिकांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. श्रीकृष्ण ज्वेलर्सचे मालक चंद्रशेखर वसंतराव काटकर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, जुन्या तहसील कार्यालया जवळील दुकान बुधवारी रात्री बंद केले होते. गुरुवारी सकाळी दुकानाचे चॅनेल गेट आणि शटरझची कुलपे तुटलेलीआढळली. चोरट्यांनी ३५० ग्रॅम चांदीचे दागिने आणि सी सीटीव्हीचा डी व्हीआर असा एकूण ३९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. याचदरम्यान विठ्ठल नगरातील दीपक लक्ष्मण गायकवाड यांच्या मेडिकल स्टोअरचे शटर तोडून चार हजार रुपयांची रोकडही लंपास करण्यात आली. याप्रकरणी मेहकर पोलिसांनी चोरीचा गुन्हा दाखल केला असून, सहायक फौजदार राजेंद्र काळे पुढील तपास करीत आहेत.

**शहरातील व्यावसायिकांत चिंतेचे वातावरण**

# सासूवर काठीने हल्ला; जीवे मारण्याची धमकी, गुन्हा दाखल

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**मलकापुर :** कौटुंबिक वादातून सासूवर लाकडी काठीने हल्ला करून जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी मलकापुर शहर पोलिसांनी जावयाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, रजीयाबी सैयद सलीम (वय ५०, रा. मुस्ताक अली नगर, मलकापुर) यांनी दिलेल्या तक्रारीवरून जावेद खान अफसर खान (वय ३४, रा. जळगाव जामोद) याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (क्चहस्) कलम ११८(१), ३५२ व ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जावेद खान यांचे पत्नी सोबत घरगुती कारणावरून वाद झाल्याने ती मागील दीड महिन्यापासून माहेरी राहत होती. दरम्यान, २८ जुलै रोजी दुपारी सुमारे २.१५ वाजताच्या सुमारास जावेद हा मद्यधुंद अवस्थेत सासूच्या घरासमोर आला. त्याने सासू व त्यांच्या मुलीला शिवीगाळ केली. समजावून सांगण्यासाठी गेल्या असता आरोपीने लाकडी काठीने त्यांच्या डोक्यावर वार करून त्यांना दुखापत केली तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

रजीयाबी सैयद सलीम यांनी उपचार घेतल्यानंतर ५ ऑगस्ट रोजी मलकापुर शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. त्यावरून गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास पो.हे.कॉ रिजवान (ब. नं. ५१४) हे करीत आहेत.

# खामगावात ट्रॅक्टर विक्रीत 27.74 लाखांचा अपहार

## शहर पोलिस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल

**खामगाव :** ट्रॅक्टर विक्री व्यवहारात ग्राहकांची तसेच कंपनीची दिशाभूल करून २७ लाख ७४ हजार २०२ रुपयांच्या मालमत्तेचा अपहार व फसवणूक केल्याप्रकरणी ५ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा खामगाव शहर पोलिसांनी तिघांविरुद्ध पोलिस अधीक्षकांच्या परवानगीनंतर गुन्हा दाखल केला आहे. फिर्यादी विष्णू पांडुरंग तायडे (४९ रा. श्रद्धा नगर, घिर्णी रोड, मलकापूर) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, आरोपींनी संगनमत करून शेगाव रोडवरील महालक्ष्मी ऑटोकॉर्प प्रा. लि. येथे ट्रॅक्टर विक्री व्यवहारा दरम्यान ग्राहकांकडून प्राप्त झालेली २ लाख ८४ हजार ५० रुपयांची रोख रक्कम, ८ लाख ५७ हजार रुपये किमतीचा नवीन ट्रॅक्टर, एक्स्चेंज मध्ये प्राप्त झालेले पाच ट्रॅक्टर (एकूण किंमत १२ लाख ७० हजार रुपये), एका ग्राहकाकडून मिळालेल्या जुन्या ट्रॅक्टर चे ७५ हजार रुपये, तसेच हिशोबातील २ लाख ८८ हजार १५२ रूपये असा एकूण २७ लाख ७४ हजार २०२ रुपयांचा ऐवज स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी परस्पर वापरल्याचा आरोप आहे. याशिवाय, ग्राहकांना देण्यात आलेल्या कच्च्या पावत्या या कंपनीच्या अधिकृत पावत्या असल्याचा भास निर्माण करून ग्राहकांची तसेच कंपनीच्या संचालकांची फसवणूक व विश्वासघात केल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी खामगाव शहर पोलिस ठाण्यात आकाश गुलाब शिरसाट (रा. रेल्वे कॉलनी, मलकापूर), प्रवीण तुकाराम बोचरे (रा. खुटपुरी, ता. खामगाव) व शिवशंकर तुळशीराम मानकर (रा. टेंभुर्णा, ता. खामगाव) यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३१६, ३१८(४), ३३६(३), ३४०, ३४४ व ३(५) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिसांकडून सुरू आहे.

# मजुरीचे पैसे मागितल्याच्या रागातून मुलाचा वडिलांवर हल्ला

प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**जळगाव जामोद :** घराच्या कर्जा चे हप्ते भरण्यासाठी मजुरीचे पैसे देण्यास सांगितल्याचा राग आल्याने दारूच्या नशेत मुलाने वडिलांना मारहाण केल्याची घटना जळगाव जामोद तालुक्यातील आसलगाव येथे घडली. याप्रकरणी ४ ऑगस्ट रोजी रात्री उशिरा जळगाव जामोद पोलिस ठाण्यात आरोपी मुलाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गजानन विश्वनाथ वानखेडे (५४, रा. आसलगाव) यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीत म्हटले आहे की, त्यांचा मुलगा श्याम गजानन वानखेडे (तय २५) याला दारूचे व्यसन आहे,४ ऑगस्ट रोजी रात्री सुमारे ८ वाजता घर बांधण्यासाठी घेतलेल्या कर्जाचे हप्ते भरण्यासाठी मजुरीचे पैसे घरी देण्याबाबत त्यांनी मुलाला सांगितले. याचा राग आल्याने श्याम घराबाहेर गेला. काही वेळाने दारूच्या नशेत परत येऊन त्याने वडिलांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. समजावण्यासाठी गेलेल्या वडिलांना त्याने चापट-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच दगड मारून जखमी केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. याप्रकरणी जळगाव जामोद पोलिसांनी श्याम गजानन वानखेडे याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास पोलिस हवालदार विनोद मोरे करीत आहेत.

# शेत जमिनीबाबत व्हायरल अफवांवर विश्वास ठेवू नका

## पात्र शेतकऱ्यांना शासनाकडून न्याय मिळेल : आमदार संजय कुटे यांचे आवाहन

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**संग्रामपूर :** परिसरात ३० आणि ३१ जुलै रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या जमिनीचे मोठे नुकसान झाले असून नदीकाठच्या परिसरातील जमिनी खरडून गेल्या आहेत.दरम्यान खरडून गेलेल्या जमिनीची एकदा सातबारावर पोट खराब म्हणून नोंद झाली तर ते क्षेत्र आपल्या वहीत जमिनीमधून वगळल्या जाते आणि यापुढे त्या क्षेत्रासाठी कोणत्याही शासकीय योजनेचा अनुदानाचा लाभमिळत नाही, अशा अफवा समाज माध्यमांवर काही जणांकडून पसरविल्या जात आहेत. या अफवांवर शेतकरी बांधवांनी विश्वास ठेवू नये, असा बहुमोल आमदार डॉ. संजय कुटे यांनी केले आहे. संदेश वजा आवाहन आमदार कुटे यांनी पुढे म्हटले आहे की, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन ठामपणे उभे असून, शासनाच्या नियमांनुसार पंचनामे आणि नुकसानाचे सर्वेक्षण करून पात्र शेतकऱ्यांना निश्चितपणे न्याय दिला जाईल. तसेच "पोटखराब" नोंदीबाबत काही ठिकाणी गैरसमज पसरविले जात असल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, अर्ध्या एकरापर्यंत क्षेत्र बाधित असल्यास पोटखराबची नोंद केली जात नाही. मात्र, अर्ध्या एकरापेक्षा अधिक क्षेत्र बाधित असल्यास शासनाच्या नियमानुसार "पोटखराब वर्ग-३" मध्ये नोंद केली जाते. या प्रक्रियेमुळे शेतकऱ्यांचे कोणतेही नुकसान किंवा हक्क बाधित होत नसल्याचे त्यांनी सांगितले. शेतकऱ्यांनी कोणतीही अप्रमाणित माहिती व्हायरल करू नये आणि सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवा आणि दिशाभूल करणाऱ्या संदेशांवर विश्वास न ठेवता अधिकृत माहितीसाठी प्रशासन व शासनाच्या सूचनांवरच विश्वास ठेवावा. शेतकऱ्यांचे हित हेच सर्वोच्च प्राधान्य असून प्रत्येक पात्र शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी आपण स्वतः आणि शासन कटिबद्ध असल्याचे आ. डॉ. कुटे यांनी नमूद केले आहे.

# ग्रामसेवकाच्या कामकाजाची चौकशी करा!

**जळगाव जामोद :** सुलज ग्रामपंचायतीतील ग्रामसेवकाच्या कार्यपद्धती विरोधात ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त करत, पंचायत समितीत गटविकास अधिकाऱ्यांना ४ ऑगस्ट रोजी निवेदन सादर केले. ग्रामसेवकाच्या कामकाजाची चौकशी करून दोषी आढळल्यास कठोर प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. निवेदना नुसार, संबंधित ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालयात नियमितपणे उपस्थित राहत नसल्याने ग्रामस्थांची विविध शासकीय कामे प्रलंबित राहत आहेत. दाखले, प्रमाणपत्रे, तसेच इतर आवश्यक कामांसाठी नागरिकांना वारंवार ग्रामपंचायतीच्या फेऱ्या माराव्या गट विकास अधिकारी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन सादर करताना सुलज ग्रामस्थ. लागत असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड

शुक्रवार, दि. ७ ऑगस्ट २०२६ Web. http://epaper:citynewssuperfast.com



# पालक पनीर, शाही पनीर, पनीर टिक्का, खाणे झाले महाग

## ॲनालॉग पनीरवर बंदी आल्याने अस्सल पनीर चे वाढले भाव

प्रतिनिधी ७ऑगस्ट




**अकोला:** पालक पनीर, मटर पनीर, शाही पनीर, पनीर भुर्जी, पनीर टिक्का सारख्या डिशेसचे नाव समोर येतात खवय्यांच्या तोंडाला पाणी सुटते. परंतु या सर्व डिशेस महाग झाल्याने खवय्यांच्या तोंडचे पाणी पळाले आहे. कारण ॲनालॉग पनीरवर शासनाने बंदी आणल्याने अस्सल पनीर चे भाव चांगलेच वधारले आहेत. ग्राहकांची फसवणूक होऊ नये आणि आरोग्याला धोका टाळण्यासाठी एफडीएने एनालॉग पनीरच्या विक्रीवर राज्यभर वर्षभरासाठी बंदी लागू केली आहे.

आता त्याची प्रतिक्रिया अकोला जिल्ह्यातही उमटू लागली आहे. अस्सल दुधापासून तयार होणाऱ्या पनीरची मागणी वाढल्याने शहरातील बाजारात पनीरच्या दरात तब्बल ८० रुपयांची वाढ झाली असून, पूर्वी ४०० रुपये किलो दराने मिळणारे पनीर आता ४८० रुपये किलो दराने विकले जात आहे.

एफडीएचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ॲनालॉग पनीरच्या उत्पादन, विक्री आणि वापरावर वर्षभरासाठी बंदी घालण्याचे आदेश दिल्यानंतर राज्यभर कारवाईला वेग आला आहे. दुधातील स्निग्धांश पूर्णपणे किंवा अंशतः वनस्पती तेलाने बदलून तयार केले जाणारे हे पनीर आरोग्यासाठी अपायकारक ठरण्याची शक्यता लक्षात घेऊन हा निर्णय घेण्या आला आहे. विशेषतः हॉटेल, रेस्टॉरंट, केटरर्स आणि क्लाऊड किचनमध्ये ॲनालॉग पनीरच्या वापरावर पूर्ण बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयानंतर बाजारात अस्सल पनीरची मागणी झपाट्याने वाढली असून पुरवठा मर्यादित असल्याने विक्रेत्यांनी दरात वाढ केली आहे. सध्या पनीर किरकोळ दर ४८० रुपये किलो असून २५० ग्रॅम पनीर १२० रुपयांना विकल्या जात आहे. ग्राहकांच्या आरोग्याच दृष्टीने एफडीएचा निर्णय स्वागतयोग्य मानला जात असला, तरी वाढलेल्या दरांमुळे सर्वसामान्य ग्राहकांसह हॉटेल व्यावसायिकांनाही आर्थिक फटका बसु लागला आहे.




### ॲनालॉग पनीर म्हणजे काय ?

दुधातील स्निग्धांशा ऐवजी वनस्पती तेल किंवा इतर फॅट वापरून तयार केलेले पनीर.दिसायला अस्सल पनीरसारखे, पण पोषणमूल्य व गुणवत्ता वेगळी असल्याने व आरोग्याला अपायकारक असल्याने यावर बंदी आली आहे

## खारगे यांनी घेतला सेवा केंद्रांचा आढावा

प्रतिनिधी ७ऑगस्ट

**अकोला :** राज्याचे महसूल अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी शुक्रवारी अकोला शहरातील तहसील कार्यालय परिसरात कार्यरत आधार सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र आणि सेतू केंद्राला भेट देत तेथील कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी विविध सेवा, नागरिकांना मिळणाऱ्या सुविधांचा तसेच अर्ज प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला.
केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांसाठी नागरिकांकडून ऑनलाईन अर्ज सादर केले जात असल्याने सेवा केंद्रांनी नागरिकांना योग्य मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य करावे, असे निर्देश त्यांनी दिले. तसेच नागरिकांचे अर्ज विहित मुदतीत सादर करून शासनाच्या सेवांचा लाभ वेळेत मिळेल, याची दक्षता घेण्याचेही त्यांनी स्पष्ट केले.
पाहणीदरम्यान अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी सेवा केंद्रांमध्ये उपस्थित नागरिकांशी संवाद साधून त्यांना येणाऱ्या अडचणी जाणून घेतल्या. तसेच सेतू केंद्र संचालकांशी चर्चा करत सेवा अधिक प्रभावी, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख पद्धतीने देण्यावर भर देण्याच्या सूचना केल्या.




देशभरात १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्याची तयारी सुरू झाली असून, शासकीय इमारती, ऐतिहासिक वास्तू आणि प्रमुख चौक तिरंगी रोषणाईने सजू लागले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून अकोला शहराच्या मध्यभागी असलेला ऐतिहासिक टॉवरही राष्ट्रध्वजाच्या केशरी, पांढऱ्या आणि हिरव्या रंगांच्या आकर्षक रोषणाईने उजळून निघाला आहे. रात्रीच्या वेळी टॉवरवरील तिरंगी प्रकाशयोजना पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत असून, हे मनमोहक दृश्य सर्वांचेच लक्ष वेधून घेत आहे.

# अल्पवयीन विद्यार्थिनीचा छळ करणाऱ्या आरोपीला सश्रम कारावास !

प्रतिनिधी ७ऑगस्ट

**अकोला :** पातुर येथील अल्पवयीन विद्यार्थिनीचा सातत्याने पाठलाग करून तिचा विनयभंग, अश्लील हातवारे आणि जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी न्यायालयाने आरोपी सैय्यद ईरशाद सैय्यद कौसर (२५) रा. मोमीनपुरा, पातुर याला दोषी ठरवत दोन वर्षांच्या सश्रम कारावासासह विविध कलमांखाली शिक्षा सुनावली आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश द. पां. सातवळेकर यांनी बुधवार, ५ ऑगस्ट रोजी हा निकाल दिला. आरोपीला भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४, ५०९ तसेच पोक्सो कायद्यातील कलम १२ अंतर्गत दोषी ठरविण्यात आले.<या प्रकरणातील पीडित अल्पवयीन मुलगी ही पातुर येथील एका विद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेत होती. ती दररोज सायकलने शाळेत व शिकवणीस जात असताना आरोपी तिचा सातत्याने पाठलाग करत होता. तिच्याकडे पाहून अश्लील हातवारे करणे, त्रास देणे तसेच ही बाब कुणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकी देणे, असे प्रकार तो सातत्याने करत होता. यानंतर १६ जून २०२४ रोजी पीडिता शिकवणीवरून घरी परतत असताना आरोपी तिच्याजवळ आला. त्याने "आय लव्ह यू" असे म्हणत तिचा हात पकडून विनयभंग केला.

### सात साक्षीदारांचा जबाब महत्त्वाचा ठरला

» पातुर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास पूर्ण केल्यानंतर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. घटनेच्या वेळी पीडितेचे वय १५ वर्षे ८ महिने १८ दिवस असल्याचे न्यायालयात स्पष्ट झाले. सरकार पक्षाने गुन्हा सिद्ध करण्यासाठी एकूण सात साक्षीदारांचे पुरावे न्यायालयासमोर सादर केले. साक्षीदारांचे जबाब, उपलब्ध पुरावे आणि परिस्थितीजन्य बाबी ग्राह्य धरत न्यायालयाने आरोपीला दोषी ठरविले. न्यायालयाने आरोपीला भादंवि कलम ३५४ अंतर्गत २ वर्षे सश्रम कारावास व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने कारावास, भा.दं.वि. कलम ५०९ अंतर्गत १ वर्ष कारावास व १ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने कारावास आणि पोक्सो कायदा कलम १२ अंतर्गत २ वर्षे कारावास व २ हजार रुपये दंड, दंड न भरल्यास ३ महिने कारावासाच्या शिक्षेची तरतूद केली आहे. या खटल्यात अतिरिक्त सरकारी विधीज्ञ, ॲड. शाम खोटरे यांनी सरकार पक्षाची प्रभावी बाजू मांडली.

# नळाद्वारे घरगुती गॅस स्टेशनला डॉ.जीशान हुसेन यांचा विरोध

## अदानी कंपनीला पायघड्या घालण्याचा सत्तारुढ पक्षाचा प्रयत्न

प्रतिनिधी ७ऑगस्ट



**अकोला:** एखाद्या प्रोजेक्टसाठी महापालिकेच्या ताब्यातील जमीन देताना निश्चित केलेले नियम बाजुला ठेवत महापालिका अदानी कंपनीला मोक्याच्या ठिकाणची जागा देत असून या माध्यमातून कोट्यावधीचे नुकसान होत असल्याचा आरोप विरोधी पक्ष नेता व काँग्रेस गटनेता डॉ. जीशान हुसेन यांनी केला आहे. त्यांनी काल महापालिकेच्या आमसभेत या विषयावर जोरदार विरोध केला.

गुरुनानक विद्यालय नजीक असलेल्या महापालिकेच्या जागेवर अदानी कंपनी एक प्रेशर प्लँट स्थापन करत आहे. नळाद्वारे घरगुती गॅस पुरवठ्यासाठी महत्वाचा आहे. पण,यासाठी जागा देताना सत्तारुढ पक्षाने महापालिकेचे तसेच राज्य सरकारच्या नियमाचे पालन केले नसून नियमबाह्यपणे, जागा देण्याच्या ठरावा काँग्रेसने आज संघटीत पणे डॉ.जीशान हुसेन यांच्या नेतृत्वात विरोध केला. इतकेच नाही तर या विषयावर मतदान घेतले. पण, सत्तारुढ पक्षाने ४७ विरोधात २२ मतांनी अदानी कंपनीला जमीन देण्याचा ठराव मान्य केला.

# प्रत्येक प्रभागात एक ओपन जिम उभारा

## निलोफर खान यांची आक्रमक मागणी

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**अकोला.** शहरातील सर्वसामान्य नागरिकांचे आरोग्य सुदृढ राहावे आणि त्यांना मोफत व्यायामाची सोय उपलब्ध व्हावी, यासाठी महापालिका प्रशासनाने शहराच्या प्रत्येक प्रभागात किमान एक आधुनिक 'ओपन जिम' उभारावी, अशी आक्रमक आणि सर्वसमावेशक मागणी काँग्रेस नगरसेविका निलोफर खान यांनी केली आहे.

नागरिकांच्या आरोग्याशी तडजोड खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा देत निलोफर खान यांनी प्रशासनाच्या निधी वाटपातील पक्षपातावर जोरदार निशाणा साधला. 'खेळ आणि आरोग्याच्या सुविधा फक्त काही विशिष्ट किंवा उच्चभ्रू भागांपुरत्या मर्यादित का? शहरातील प्रत्येक प्रभागातील महिला, तरुण आणि ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या घराच्या जवळ व्यायामाची उत्तम साधने मिळणे हा त्यांचा हक्क आहे,' असे निलोफर खान यांनी ठामपणे सांगितले. प्रत्येक प्रभागातील सार्वजनिक उद्याने किंवा मोकळ्या जागांचा वापर करून तेथे ओपन जिमची स्थापना करावी. प्रभाग क्रमांक १,७,१० आणि ११ मध्ये देखील ओपन जीम असावी अशी मागणी केली. तर दुध आणि दुग्ध जन्य पदार्थांच्या विक्रीसाठी विधवा महिलांना प्राधान्य द्यावे अशी मागणी त्यांनी केली. शहरातील गरिब वस्त्यांमध्ये त्यास मान्यता देण्याची मागणी काँग्रेस नगरसेविका निलोफर खान यांनी केली आहे.

# भजन-कीर्तनाच्या गजरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज चरणपादुका सोहळा




प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**अकोला :** श्री गुरुदेव सेवा मंडळ, अकोला जिल्ह्याच्या वतीने वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या आषाढ वारी चरणपादुका सोहळ्याचे आयोजन भक्तिमय वातावरणात करण्यात आले. केशव नगर रिंग रोड येथील ज्ञानदीप पॅनल कार्यालय परिसरात झालेल्या या सोहळ्यास भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.कार्यक्रमाची सुरुवात श्री. चंद्रशेखर चतारे गुरुजी यांच्या उपस्थितीत झाली. यानंतर श्री राजराजेश्वर मंदिरात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या चरणपादुकांचे पूजन व दर्शन घेण्यात आले. त्यानंतर संत तुकाराम चौक ते ज्ञानदीप मंगल कार्यालय या मार्गावर भजन-कीर्तनाच्या गजरात भव्य शोभायात्रा काढण्यात आली. शोभायात्रेत भाविक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दिवसभर चाललेल्या या सोहळ्यात राष्ट्रसंत भजन गायन, सामुदायिक प्रार्थना, सत्कार समारंभ तसेच राष्ट्रीय कीर्तन आदी विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय कीर्तनाची सेवा ह.भ.प. श्री. मुकुंदराव गाडेकर महाराज यांनी केली. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या चरणपादुकांचे दर्शन व आशीर्वाद घेण्यासाठी अकोला शहरासह परिसरातील भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. संपूर्ण परिसर भजन, कीर्तन आणि 'राष्ट्रसंत तुकडोजी महाराज की जय'च्या जयघोषाने भक्तिमय झाला होता.

# रखडलेला कॅनॉल रोड आणि प्रभागातील पाणी समस्या सोडवा

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**अकोला.** प्रभाग क्रमांक ८ मधील कॅनॉल रोड आणि पाणी समस्या गंभीर बनली आहे. कॅनॉल रोड काही वर्षांपासून रखडलेला आहे तर पाणी समस्या सतत भेडसावत आहे. नगरसेवक मनोज पाटील यांनी आजच्या आमसभेत हा विषय पुन्हा उचलला. तसेच समस्या सोडवून प्रभागातील नागरिकांना न्याय मिळवून दिल्याशिवाय स्वस्थ बसणार नाही असा निर्धार व्यक्त केला.

कॅनॉल रोड हा खूप वर्षापासून रखडलेला आहे. पावसाळ्याच्या दिवसात त्या रस्त्यावर चालणे सुद्धा कठीण आहे. त्यामुळे हा रस्ता लवकरात लवकर पूर्ण व्हावा. याकरिता गेल्या कित्येक वर्षापासून नगरसेवक मनोज पाटील आंदोलन करत आहेत. त्याच भूमिकेवर ठाम राहून परत एकदा ज्वलंत विषय सभागृहात मांडला. प्रभाग क्रमांक 8 हा पूर्वी ग्रामीण मध्ये मोडायचा. या भागामध्ये बोरिंग किंवा हात पंपाची कमतरता आहे. नवीन बोरिंग साठी आता परवानगी मिळत नाही. तरी रेन वॉटर हार्वेस्टिंग हे ज्या ठिकाणी जुने बोरिंग किंवा हातपंप आहेत त्या ठिकाणी करण्यात यावे.

जेणेकरून त्याचे पाणी

# भटोरी येथे 20 वर्षीय युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**मूर्तिजापूर :** तालुक्यातील भटोरी येथे २० वर्षीय युवकाने घरातील जनावरांच्या गोठ्यात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना बुधवारी (दि. ५) दुपारी उघडकीस आली. या प्रकरणी मूर्तिजापूर ग्रामीण पोलिसांनी मर्ग क्रमांक २३/२०२६ कलम १९४ बीएनएसएस अंतर्गत नोंद करून तपास सुरू केला आहे.

मृत युवकाचे नाव देवांशु रामराव बोंडे (वय अंदाजे २०, रा. भटोरी, ता. मूर्तिजापूर) असे आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, देवांशु हा बुधवारी सकाळी सुमारे १०.३० वाजता नेहमीप्रमाणे जनावरांना चारा-पाणी करण्यासाठी गोठ्यात गेला होता.

# महिलेने दिला एक.. दोन.. नव्हे तब्बल चार बाळांना जन्म!

## दुर्मिळातील दुर्मिळ घटना, जळगाव जामोद येथील मातेसह बाळं सुखरूप



प्रतिनिधी ७ ऑगस्ट

**बुलडाणा :** मानवी जीवन अनेक चमत्कारीक घटनांनी भरलेले असून अशा चमत्कारीक किंवा दुर्मिळ घटना काही क्षण मानवी विचारशक्तीच कुंठीत करतात. या दुर्मिळातील दुर्मिळ घटनेचा प्रत्यय नुकताच बुलडाणा जिल्ह्यात आला. एका माते एक.. दोन.. नव्हे तर चार बाळांना जन्म दिला आहे. विशेष म्हणजे ही प्रसूती नैसर्गिक झाली असून, चारही बाळं आणि माता सुखरूप आहेत. मात्र ही प्रसूती वेळेआधी झाल्याने बाळांचे वजन कमी असल्याने त्यांना डॉक्टरांच्या देखरेखीखाली सध्या ठेवण्यात आले आहे.

बुलढाणा जिल्ह्यातील जळगाव जामोद तालुक्यातील आदिवासी बहुल भागातील 'चारबन' या गावातून एक अत्यंत दुर्मिळ आणि थक्क करणारी घटना समोर आली आहे. गावातील रहिवासी पंशिराम सस्त्या यांची २७ वर्षीय पत्नी रियानी यांनी कोणत्याही वैद्यकीय सुविधेविना अत्यंत कठीण परिस्थितीत घरीच प्रसूतीदरम्यान तीन मुले आणि एक मुलगी अशा चार मुलांना जन्म दिला आहे. प्रसूतीनंतर माता आणि चारही नवजात बालकांना तातडीने जळगाव जामोद येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. डॉक्टरांनी केलेल्या प्राथमिक तपासणीत आई रियानी आणि चारही बाळांची प्रकृती सुदैवाने स्थिर असल्याचे आढळले. बालकांचे वजन ९०० ग्रॅम ते १ किलोदरम्यान असल्याने पुढील विशेष वैद्यकीय उपचारासाठी त्यांना तातडीने खामगाव येथील सामान्य रुग्णालयात हलवण्यात आले आहे.

### रियानी सस्त्याला एकूण सात मुले

दुर्मिळातील दुर्मिळ घटनेतील माता रियानी सस्त्या हिला एकाच वेळी चार मुलांना नैसर्गिक प्रसूतीद्वारे आणि तेही वैद्यकीय सुविधेविना जन्म दिला. ही घटना परिसरात चर्चेचा विषय बनला आहे. यात विशेष बाब म्हणजे रियानी सस्त्या हिला यापूर्वी एक मुलगा आणि दोन मुली असून, सध्या तिला एकूण सात अपत्य आहेत.

रियानी सस्त्या हिला आमच्या रूग्णालयात चार बाळांसह ५ ऑगस्टला भरती करण्यात आले. बाळाचे वजन कमी असल्यामुळे सध्या त्यांच्यावर तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्याने औषधोपचार सुरू असून, माता व चारही बाळांची प्रकृती स्थिर आहे.

**वैशाली यांगड,** स्टाफ नर्स, खामगाव

### कोट्यवधी प्रसूतीनंतर घडणार 'रेअर' घटना!

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, लाखो किंवा कोट्यवधी प्रसूतींमागे घडणारी ही अत्यंत दुर्मिळ घटना आहे. या वैद्यकीय भाषेत 'रेअर केस' असेही संबोधण्यात येते. अशा प्रकरणात मुदतीपूर्व प्रसूतीमुळे बाळांचे वजन कमी असणे स्वाभाविक असते. सध्या खामगाव येथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली माता व बालकांवर उपचार सुरू असून संपूर्ण परिसरात या घटनेची मोठी चर्चा आहे.

### कोट्यवधी प्रसूतीनंतर घडणार 'रेअर' घटना!

वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, लाखो किंवा कोट्यवधी प्रसूतींमागे घडणारी ही अत्यंत दुर्मिळ घटना आहे. या वैद्यकीय भाषेत 'रेअर केस' असेही संबोधण्यात येते. अशा प्रकरणात मुदतीपूर्व प्रसूतीमुळे बाळांचे वजन कमी असणे स्वाभाविक असते. सध्या खामगाव येथे तज्ज्ञ डॉक्टरांच्या देखरेखीखाली माता व बालकांवर उपचार सुरू असून संपूर्ण परिसरात या घटनेची मोठी चर्चा आहे.

# शहरातील काही प्रभागांमध्ये खासदार निधीतून ओपन जिम उभारणार

## ओपन जिमबाबत नगरसेवक सुनील इन्नानी यांचा सल्ला

प्रतिनिधी ७ ऑगस्ट



**अकोला:** महापालिकेच्या आमसभेत नगरसेवक सुनील इन्नाणी यांनी शहरातील खासदार निधीअंतर्गत उभारण्यात येणाऱ्या ओपन जिमबद्दल आपला उत्कृष्ट सल्ला देत सभागृहाचे लक्ष वेधले.

आज महापालिकेच्या सभेत विविध विषयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आला. खासदार निधीअंतर्गत शहरातील काही प्रभागांमध्ये ओपन जिमची उभारणी केली जाणार आहे. या विषयावर चर्चा करताना नगरसेवक सुनील इन्नाणी म्हणाले की, वर्षातील तिन्ही ऋतू लक्षात घेता आणि ओपन जिममध्ये व्यायाम करताना महिलांना येणाऱ्या अडचणी पाहता, ओपन जिमऐवजी तिथे सामाजिक संस्थांच्या माध्यमातून खोल्यांचे (रूम्स) बांधकाम करावे. ज्यामुळे सर्वांना सोय होईल. परंतु, या चांगल्या सल्ल्याचा सत्ताधाऱ्यांनी नेहमीप्रमाणे विरोध केला. शहर विकासाच्या दृष्टीने विरोधी पक्षाच्या सदस्यांनी आमसभेत केलेल्या सूचना विचारात घेतल्यास फायदा होतो. परंतु दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. या बाबतीत काही सदस्यांनी सभेनंतर नाराजी व्यक्त केली.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135